पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३४६ ■ गुरूवार, दि. २५ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# ‘तो’ प्रसंग आठव आणि कोणती शिक्षा देऊ !

## न्यायालयाची आरोपीला विचारणा, नसरापूर प्रकरणात भीमराव कांबळे दोषी



सोमवारी सुनावणार शिक्षा

प्रतिनिधी २५ जून

**पुणे :** महाराष्ट्र दिनी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करुन खून केल्याप्रकरणी न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळेला (६५) दोषी ठरवले आहे. विशेष न्यायालयात बंद दाराआड (इन कॅमेरा) या संवेदनशील प्रकरणाची सुनावणी झाली. ‘तो प्रसंग आठव आणि कोणती शिक्षा देऊ’, अशी विचारणा न्यायालयाने आरोपी कांबळेला केल्याची माहिती समोर आली आहे. कांबळेला २९ जून रोजी शिक्षा सुनावली जाणार असून, न्यायालय आता कांबळेला काय शिक्षा ठोठावणार? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. राज्यातील न्यायालयीन इतिहासात जलदगतीने सुनावणी झालेला नसरापूर अत्याचार प्रकरण हा पहिला खटला ठरणार आहे.

संपूर्ण राज्याला हादरवणाऱ्या नसरापूर येथील अत्याचार आणि हत्या प्रकरणामध्ये पुणे जिल्हा आणि सत्र न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे याला दोषी ठरवले आहे. आरोपी भीमराव कांबळे याने १ मे रोजी एका अल्पवयीन मुलीवर क्रूरपणे अत्याचार करून नंतर तिची निर्घृण हत्या केली होती. या प्रकरणी निकाल देताना न्यायमूर्तींनी आरोपीवरील सर्व आरोप सिद्ध झाले आहेत, असे सांगत आरोपीला दोन गुन्ह्यात फाशी आणि दोन गुन्ह्यात जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद आहे, असे निकाल सुनावताना सांगितले. यावेळी निकाल सुनावताना न्यायमूर्तींनी प्रसंग आठव आणि तूच तुला काय शिक्षा पाहिजे ते सांग, असे आरोपी भीमराव कांबळे याला विचारले. तेव्हा आरोपी भीमराव कांबळे हा निरुत्तर झाला.

दरम्यान, आरोपी भीमराव कांबळे याच्यावर गुन्हे सिद्ध झाल्याने त्याला मृत्युदंडाची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी सरकारी पक्षाच्या वकिलांनी केली आहे. या प्रकरणाच्या निकालावेळी न्यायालयात अत्यंत गंभीर वातावरण होते. शिक्षा सुनावण्यापूर्वी न्यायाधीशांनी आरोपीला त्याचे नाव विचारले. त्यानंतर त्याच्याविरुद्धचे आरोप आणि न्यायालयाने शाबित मानलेले गुन्हे स्पष्ट केले. संबंधित गुन्ह्यांसाठी कायद्यात कोणत्या शिक्षेची तरतूद आहे, याचीही माहिती आरोपीला देण्यात आली. पुणे ग्रामीण पोलिसांनी अल्पावधीत तपास पूर्ण करून १,२०० पानी आरोपपत्र न्यायालयात सादर केले. प्रकरणाचा निकाल जाहीर होण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

### कोर्ट काय म्हणालं?

‘ही घटना समाजासाठी घातक असं सरकारी पक्षाला वाटतं. दुर्दैवी मुलीवर झालेले अत्याचार हे परिस्थितीजन्य पुरावे आणि साक्षीदारांमुळे कोर्टात सिद्ध झाले. आरोपीचा इतिहास पाहता तो सुधारु शकत नाही, असं सरकारी पक्षाला वाटतं. तर घटनांची संगती लागत नसल्याचा बचाव पक्षाचा दावा आहे. घटनेमुळे आरोपी धक्क्यात गेल्याचं त्यांचं म्हणणं आहे. आरोपी वृद्ध असल्याने तो इतका क्रूर गुन्हा करु शकतो का, असा प्रश्नही बचाव पक्षाला पडला आहे.’ असं कोर्ट म्हणालं.

### आरोपीचे अस्तित्व समाजाने नाकारले!

‘आरोपीला सात मुलं आणि पत्नी आहेत, मात्र त्याला वाचवायला कोणीही आलं नाही. समाजाने आरोपीचं अस्तित्व नाकारलं आहे. फाशीच्या शिक्षेची तरतूद असलेल्या दोन गुन्ह्यात तो दोषी आहे’ अशा शब्दात कोर्टाने मृत्युदंडाच्या शिक्षेचे संकेत दिले होते.

### कठोरात कठोर शिक्षा द्या, सरकारी वकिलांची मागणी

दरम्यान, या प्रकरणातील दोषी आरोपी भीमराव कांबळे याला कोणती शिक्षा सुनावण्यात यावी, यावर कोर्टात युक्तिवाद सुरू आहे. यावेळी हे संपूर्ण कृत्य हे वासनेच्या भारात केले होते. आरोपीला त्याने केलेल्या कृत्याचा कुठलाही पश्चाताप दिसत नाही आहे. त्यामुळे त्याला कठोरात कठोर शिक्षा सुनावण्यात यावी, अशी मागणी सरकारी वकिलांनी केली आहे.

# पासपोर्ट हे नागरिकत्व सिद्ध करणारे दस्तऐवज नाही!

वृत्तसंस्था २५ जून

**नवी दिल्ली :** पासपोर्ट हे नागरिकत्व सिद्ध करणारे दस्तऐवज नाही, असे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. मंत्रालयाने १४ व्या पासपोर्ट सेवा दिनाच्या निमित्ताने ही घोषणा केली. यानंतर आता भारतीय सीमांवर भारताच्या नागरिकत्वाचा निश्चित पुरावा कोणता, याबाबत चर्चांना सुरुवात झाल्याचे म्हटले जात आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले की, पासपोर्ट हे प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय प्रवास सुलभ करण्यासाठी सरकारने जारी केलेले प्रवास दस्तऐवज आहे. केवळ पासपोर्ट असण्याने नागरिकत्व सिद्ध होत नाही. यातून परिस्थितीतील विरोधाभास अधोरेखित होतो, कारण जे नागरिक नाहीत त्यांना पासपोर्ट जारी केले जात नाहीत. परराष्ट्र मंत्रालयाने भारताच्या पासपोर्ट सेवा नेटवर्कच्या विस्तारावर आणि चिप-सक्षम ई-पासपोर्टच्या यशस्वी प्रारंभासह अनेक प्रमुख कामगिरींवर प्रकाश टाकला. २०२५ मध्ये १५ दशलक्ष पासपोर्ट आणि संबंधित सेवा प्रदान करण्यात आल्या, त्यापैकी केवळ पासपोर्टची संख्या १३.९ दशलक्ष होती, असे परराष्ट्र मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. तसेच पासपोर्ट प्रक्रियेसाठी लागणाऱ्या सरासरी वेळेतही सुधारणा झाली आहे.






# आमचा एकही खासदार फुटणार नाही- शरद पवार

प्रतिनिधी २५ जून



**बारामती :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या लोकसभेतील सहा खासदारांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून दिली. केंद्रातील एनडीए सरकारला विविध विधेयके मंजूर करून घ्यायची असल्यानेच खासदारांची जमवाजमव सुरू असल्याची चर्चा रंगत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील आणखी एका राजकीय पक्षाला धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात असून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदारही वेगळ्या विचारात असल्याचं बोललं जात आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज बारामती दौऱ्यावर असताना आमचा एकही खासदार फुटणार नाही, असे म्हणत सर्वच चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

शरद पवार हे आज बारामती दौऱ्यावर असून त्यांनी पक्षातील खासदारांच्या फुटीच्या चर्चांवर स्पष्ट भूमिका मांडली. माध्यमांशी संवाद साधताना पवार म्हणाले की, ’खासदार फुटणार असल्याच्या चर्चेला काहीही अर्थ नसून आमचा एकही खासदार फुटणार नाही.’ काही दिवसांपूर्वीच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे सहा खासदार शिंदेंच्या शिवसेनेत दाखल झाले. त्यामुळे बाकी पक्षातील खासदार देखील सत्ताधारी पक्षाच्या संपर्कात असल्याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून बच्चू कडूंचा सरकारला घरचा आहेर !

## जाचक अटींमुळे सरकारची प्रतिमा मलीन होतेय !

प्रतिनिधी २५ जून



**मुंबई :** राज्यातील शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी, प्रोत्साहन अनुदानाची मर्यादा, ओटीएस (वन टाईम सेटलमेंट) योजना आणि प्रलंबित लाभांच्या वितरणावरून शिवसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी विधानपरिषदेत कर्जमाफीतील त्रुटीवरून जोरदार टीका केली. कर्जमाफीच्या अंमलबजावणीत असलेल्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेमुळे आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांमुळे सरकारची प्रतिमा खराब होत असून जनतेचा रोष वाढत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच कर्जमाफीसाठी आणि प्रोत्साहन अनुदानासाठी लावलेल्या अटी तातडीने रद्द केल्या पाहिजेत. ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहन रकमेऐवजी एक लाख रुपये देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही कडू यांनी केली.

नियम २६० अन्वये कर्जमाफीच्या अनुषंगाने विधानपरिषदेत उपस्थित चर्चेत बोलताना कडू यांनी ओटीएस योजनेबाबत संभ्रम असल्याचे सांगत त्यांनी सरकारकडे स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी केली. राज्य सरकारच ओटीएस योजना राबवत असताना बँकांवर जबाबदारी ढकलली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उदाहरणाचा उल्लेख करत, व्याजमाफीसारखे निर्णय राज्यभरातील सहकारी बँकांनी घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

# अंबादास दानवे चक्क महायुतीच्या गोटात !

## मविआच्या पॅनलऐवजी भाजप–शिंदे गटासोबत बांधले संधान



प्रतिनिधी २५ जून

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आमदार अंबादास दानवे यांनी जिल्हा बँक निवडणुकीत चक्क भाजप आणि महायुतीसोबत संधान बांधले आहे. महायुती आणि महाविकास आघाडी असे दोन पॅनल झालेले असतानाही दानवे यांनी मविआऐवजी महायुतीच्या पॅनलमध्ये सामील होण्यास पसंती दिली आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

जिल्हा बँक निवडणुकीत आत्तापर्यंत ८ जण बिनविरोधसंचालक झाले असून, १२ जागांसाठी निवडणूक होत आहे. बिनविरोधचा प्रयत्न फसल्यानंतर महायुती आणि मविआचे पॅनल बनले असून, त्यांच्यात थेट लढत होत आहे. विशेष म्हणजे मविआचे पॅनल बनले असतानाही ठाकरे गटाचे नेते आ. अंबादास दानवे यांनी महायुतीच्या पॅनलमधून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे.

# तुकाराम मुंढेंच्या बदलीसाठी 250 कोटी गोळा?

## मंत्री नरहरी झिरवाळांनी फेटळला आरोप, विभागात मनुष्यबळाचा अभाव

प्रतिनिधी २५ जून



**मुंबई :** राज्यातील बेकायदा गुटखा विक्री, अन्नपदार्थांमधील भेसळ, बोगस औषधांच्या विरोधात धडक कारवाई सुरू केल्याने चर्चेत आलेला अन्न आणि औषध प्रशासन विभाग (एफडीए) आवश्यक संसाधनांविना अभावग्रस्त असल्याची कबुली विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी बुधवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ, अधिकाऱ्यांना लागणारी वाहने, कार्यालये आणि अन्न तपासणीच्या प्रयोगशाळा नसल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच तुकाराम मुंढे यांची बदली केली जाणार नाही किंवा त्यांचे कामही थांबवले जाणार नाही, अशी माहिती झिरवळांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या काशिनाथ दाते यांनी बुधवारी विधानसभेत अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या वतीने सुरू असलेल्या धाडसत्राबद्दल लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या जोरदार चर्चेला उत्तर देताना झिरवाळ यांनी विभागात असलेल्या कमतरतेची माहिती दिली. ‘विभागातील ३५० मंजूर पदांपैकी ३१६ कार्यरत असून ४३ रिक्त आहेत. औषध निरीक्षकांची २०० पदे मंजूर असून यापैकी १५९ पदे भरलेली नाहीत. अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांची १९७ पदे भरली आहेत.

# कोणाचेही घर आम्ही बॉम्बने उडवू देणार नाही - मुख्यमंत्री

## खा. संजय राऊतांना केले आश्वस्त, शिंदेंच्या खासदाराला फटकारले



प्रतिनिधी २५ जून

**नागपूर :** ईशान्य मुंबईतील खा. संजय दिना पाटील यांनी आंदोलनकर्त्यांना जीवे मारण्याच्या आणि बॉम्ब टाकण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप खा. संजय राऊत यांनी मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांना पाठवलेल्या पत्रात केला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद फडणवीस म्हणाले की, कोणाचेही घर आम्ही बॉम्बने उडवू देणार नाही आणि पोकळ धमक्यांना कोणीही घाबरू नये. कोणी धमक्या देत असेल तर त्यावर पोलिस योग्य कारवाई करतील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय दिना पाटलांना सुनावले आहे.

संजय राऊत यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून फुटलेले सहा खासदार जनतेच्या रोषाला सामोरे जात असून त्यांच्याविरोधात राज्यभर आंदोलन होत आहेत. आंदोलन करणे आणि लोकप्रतिनिधींना जाब विचारणे हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार असल्याचे नमूद करत त्यांनी खासदार संजय दिना पाटील यांच्यावर आंदोलनकर्त्यांना धमकावल्याचा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर इथं बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. दरम्यान, नागपूर विमानतळाच्या हस्तांतरण प्रक्रियेबाबतही मुख्यमंत्र्यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

### कार्गो हबचा मार्गही झाला मोकळा!

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, नागपूरला देशातील प्रमुख कार्गो हब बनविण्याचे स्वप्न अनेक वर्षांपासून पाहिले जात होते. मात्र विमानतळ विकास हा त्यातील अत्यंत महत्त्वाचा घटक होता. आता हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्याने कार्गो हब प्रकल्पाला वेग मिळेल. भविष्यात नागपूर मध्य भारतातील सर्वात महत्त्वाचे विमानतळ केंद्र म्हणून उदयास येईल आणि शेतकरी, उद्योग, व्यापारी तसेच संपूर्ण विदर्भाच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# रानडुकराच्या हल्ल्यात वाघ जखमी !

## टिपेश्वर अभयारण्यातील घटना, जखमी ‘वीर’ वाघावर वन विभागाचे लक्ष

प्रतिनिधी २५ जून



**यवतमाळ :** टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यातील पर्यटकांचे आकर्षण असलेला ‘वीर’ वाघ शिकार करताना रानडुकराशी झालेल्या संघर्षात जखमी झाला आहे. जखमी अवस्थेतही हा वाघ अभयारण्य परिसरात मुक्तपणे वावरत असून, त्याच्या प्रकृतीवर वन विभागाकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे आठवडाभरापूर्वी एका नाल्याजवळ शिकार करण्याच्या प्रयत्नात ‘वीर’चा रानडुकराशी सामना झाला. यावेळी रानडुकराने केलेल्या प्रतिहल्ल्यात वाघाच्या दोन्ही पुढील पायांच्या वरच्या भागाला दुखापत झाली. रानडुकराच्या धारदार सुळ्यांमुळे ही जखम झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच वन विभागाने तातडीने निरीक्षण सुरू केले. विशेष पथकाच्या माध्यमातून ‘वीर’च्या हालचालींवर २४ तास लक्ष ठेवण्यात येत आहे. जखमी असूनही वाघ नियमित हालचाल करत असून त्याची स्थिती नियंत्रणात असल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. ही दुखापत नैसर्गिक प्रक्रियेतून शिकार करताना झालेली आहे. वाघ स्वतः जखमेची काळजी घेत असल्याने ती नैसर्गिकरीत्या भरून येण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिक आणि पर्यटकांनी घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# एमईआरसीच्या वीजदरप्रश्नी मुख्यमंत्री बैठक घेणार!

प्रतिनिधी २५ जून

**कोल्हापूर :** एमईआरसीने केलेली वीज दरवाढ आणि ग्राहकांवर लावल्या गेलेल्या टीओडी आणि ग्रीड चार्जेस अन्यायकारी आहे. त्यामुळे या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांनी तातडीने बैठक घ्यावी, अशी मागणी काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी बुधवारी विधिमंडळात केली. यावर मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस यांनी ज्या घटकांवर अन्याय झाल्याची भावना आहे त्या सर्वांचे म्हणणे जाणून घेण्यासाठी लवकरच बैठक घेऊ असे आश्वासन दिले.आमदार पाटील म्हणाले, राज्यातील औद्योगिक आणि आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी वीज विक्री करांमध्ये वाढ केली आहे. राज्य शासन दरवाढ न होण्याचा कितीही सांगत असले तरी तशी वस्तुस्थिती नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
गुरुवार, दि. २५ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## पावसाळ्यातील घरात भिरभिरणाऱ्या माशा..!

पावसाळ्यासोबत काही नकोशा समस्याही घरात डोके वर काढतात. त्यापैकीच एक मुख्य आणि अत्यंत त्रासदायक समस्या म्हणजे घरात भिरभिरणाऱ्या माशा. पावसाळ्यात हवेतील आर्द्रता वाढते आणि कचरा किंवा दमट जागेत कचरा सडण्याचे प्रमाण वाढते. हे वातावरण माशांच्या प्रजननासाठी अगदी पोषक असते. घराच्या आजूबाजूला किंवा घरात थोडी जरी अस्वच्छता असेल, तर या माशा घरात प्रवेश करतात. माश्या केवळ अन्नावर बसून ते दूषित करत नाहीत, तर कॉलरा, टायफॉइड, डायरिया यांसारखे गंभीर आजारही पसरवतात. बाजारात मिळणारे केमिकल स्प्रे तात्पुरता आराम देतात, पण ते आपल्या आरोग्यासाठी, विशेषतः लहान मुले आणि पाळीव प्राण्यांसाठी घातक ठरू शकतात.

# देशात लागली होती 21 महिन्यांची आणिबाणी !

**तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ रोजी देशात अंतर्गत आणीबाणी जाहीर केली होती. संविधानाच्या अनुच्छेद ३५२ अंतर्गत 'अंतर्गत अस्थैर्य' असल्याचे कारण देत, राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी या घोषणेवर स्वाक्षरी केली होती. भारतातील आणीबाणी हा १९७५ ते १९७७ पर्यंतचा २१ महिन्यांचा कालावधी होता. जेव्हा पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशाला अंतर्गत आणि बाह्य धोके असल्याचे सांगून संपूर्ण भारतात आणीबाणी जाहीर केली होती.**

प्रचलित 'अंतर्गत अशांततेमुळे' राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी संविधानाच्या कलम ३५२ अंतर्गत अधिकृतपणे जारी केलेली आणीबाणी २५ जून १९७५ पासून लागू झाली आणि २१ मार्च १९७७ रोजी संपली. या आदेशाने पंतप्रधानांना हुकूमनाम्याद्वारे राज्य करण्याचा अधिकार दिला, ज्यामुळे निवडणुका रद्द करणे आणि नागरी स्वातंत्र्य निलंबित करणे शक्य झाले. आणीबाणीच्या काळात, गांधींच्या बहुतेक राजकीय विरोधकांना तुरुंगात टाकण्यात आले आणि प्रसारमाध्यमांवर निर्बंध लादण्यात आले. १ लाखांहून अधिक राजकीय विरोधक, पत्रकार आणि असंतुष्टांना तुरुंगात टाकण्यात आले. याच काळात, त्यांचे पुत्र संजय गांधी यांनी नसबंदीसाठी एक व्यापक मोहीम सुरू केली.

आणीबाणी लागू करण्याचा अंतिम निर्णय इंदिरा गांधी यांनी प्रस्तावित केला, भारताच्या राष्ट्रपतींनी त्याला सहमती दिली आणि जुलै ते ऑगस्ट १९७५ दरम्यान मंत्रिमंडळ आणि संसदेने त्याचे अनुमोदन केले . भारतीय राज्याला तात्काळ अंतर्गत आणि बाह्य धोके आहेत या तर्कावर तो आधारित होता.

९६७ ते १९७१ या काळात पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सरकार आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षावर जवळजवळ संपूर्ण नियंत्रण मिळवले, तसेच संसदेत प्रचंड बहुमतही मिळवले. हे नियंत्रण त्यांनी मंत्रिमंडळाऐवजी पंतप्रधानांच्या सचिवालयात केंद्र सरकारची सत्ता केंद्रित करून मिळवले , कारण मंत्रिमंडळाच्या निवडून आलेल्या सदस्यांना त्या धोकादायक मानत आणि त्यांच्यावर अविश्वास दाखवत होत्या. यासाठी त्यांनी त्यांचे प्रधान सचिव, पी. एन. हक्सर यांच्यावर अवलंबून राहिल्या , जे इंदिरा गांधींच्या सल्लागारांच्या जवळच्या वर्तुळातील एक प्रमुख व्यक्ती होते. याशिवाय, हक्सर यांनी 'वचनबद्ध नोकरशाही'च्या कल्पनेला प्रोत्साहन दिले, ज्यानुसार आतापर्यंत निष्पक्ष असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनी काँग्रेसच्या विचारधारेला 'वचनबद्ध' असणे आवश्यक होते.

काँग्रेसमध्ये, इंदिरा गांधींनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर डावपेचाने मात




केली आणि १९६९ मध्ये पक्षाला विभाजित होण्यास भाग पाडले—काँग्रेस (ओ) (ज्यात 'सिंडिकेट' म्हणून ओळखले जाणारे जुने जाणते नेते होते) आणि त्यांची काँग्रेस (आर) असे दोन पक्ष तयार झाले. अखिल भारतीय काँग्रेस समिती आणि काँग्रेसच्या बहुसंख्य खासदारांनी पंतप्रधानांची बाजू घेतली. इंदिरा गांधींचा पक्ष हा जुन्या काँग्रेसपेक्षा वेगळ्या प्रकारचा होता, जी अंतर्गत लोकशाहीची परंपरा असलेली एक मजबूत संस्था होती. दुसरीकडे, काँग्रेस (आर) मध्ये सदस्यांच्या लवकरच लक्षात आले की पक्षात त्यांची प्रगती केवळ इंदिरा गांधी आणि त्यांच्या कुटुंबाप्रती असलेल्या निष्ठेवर अवलंबून आहे आणि खुशामतीचे प्रदर्शन नित्याचे झाले. येत्या काही वर्षांत, इंदिरा गांधींचा प्रभाव इतका वाढला की, काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाकडून निवडून येण्याऐवजी, त्या आपल्या मर्जीतील निष्ठावंतांना राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या पदावर बसवू शकल्या.

इंदिरा गांधींच्या उदयाला जनतेमधील त्यांच्या करिष्माई आकर्षणाचा पाठिंबा होता, ज्याला त्यांच्या सरकारच्या जवळजवळ मूलगामी डाव्या विचारसरणीच्या वळणांनी मदत केली. यामध्ये जुलै १९६९ मध्ये अनेक प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि सप्टेंबर १९७० मध्ये संस्थानिकांचे तनखेचे उच्चाटन यांचा समावेश होता; हे बदल अनेकदा त्यांच्या विरोधकांना धक्का देत, अध्यादेशाद्वारे अचानकपणे केले गेले . त्यांना वंचित घटकांमध्ये—गरीब, दलित , महिला आणि अल्पसंख्याकांमध्ये मोठा पाठिंबा होता. इंदिरा गांधींना 'अर्थशास्त्रात समाजवाद आणि धर्माच्या बाबतीत धर्मनिरपेक्षता, गरिबांच्या बाजूने आणि संपूर्ण राष्ट्राच्या विकासासाठी उभ्या असलेल्या' म्हणून पाहिले जात होते.

१९७१ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये , इंदिरा गांधींच्या ' गरिबी हटाओ !' (गरिबी दूर करा!) या लोकप्रिय घोषणेमागे लोकांनी एकजूट दाखवून त्यांना प्रचंड बहुमत (५१८ पैकी ३५२ जागा) मिळवून दिले. इतिहासकार रामचंद्र गुहा यांनी नंतर लिहिले की, 'विजयाच्या मोठ्या फरकामुळे, काँग्रेस (आर) ही खरी काँग्रेस म्हणून ओळखली जाऊ लागली, 'ज्याला कोणत्याही विशेषणाची गरज नव्हती.'' डिसेंबर १९७१ मध्ये, त्यांच्या सक्रिय युद्ध नेतृत्वाखाली, भारताने कट्टर शत्रू पाकिस्तानचा पराभव केला , ज्यामुळे पूर्वीचे पूर्व पाकिस्तान असलेल्या बांगलादेशला स्वातंत्र्य मिळाले. पुढच्याच महिन्यात त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तेव्हा त्या त्यांच्या कारकिर्दीच्या शिखरावर होत्या; त्यांचे चरित्रकार इंदर मल्होत्रा यांच्या मते , ' 'द इकॉनॉमिस्ट'ने केलेले त्यांचे 'भारताची सम्राज्ञी' हे वर्णन अगदी योग्य वाटले.' अगदी विरोधी पक्षाचे नेते, जे त्यांच्यावर हुकूमशहा असल्याचा आणि व्यक्तिपूजा जोपासल्याचा आरोप करत असत, तेही त्यांना हिंदू देवी दुर्गा म्हणून संबोधू लागले.

जयप्रकाश नारायण २००१ च्या भारतीय टपाल तिकिटावर. १९७० च्या दशकाच्या मध्यात पंतप्रधान इंदिरा गांधी आणि भारतीय आणीबाणीच्या विरोधात विरोधी पक्षाचे नेतृत्व केल्याबद्दल ते ओळखले जातात, ज्याच्या उलथापालथीसाठी त्यांनी ' संपूर्ण क्रांती 'चे आवाहन केले होते. १९६७ च्या गोलकनाथ खटल्यात, सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, जर बदलांमुळे मूलभूत हक्कांसारख्या मूलभूत बाबींवर परिणाम होत असेल, तर संसद घटनेत दुरुस्ती करू शकत नाही. हा निकाल रद्द करण्यासाठी, गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे वर्चस्व असलेल्या संसदेने १९७१ मध्ये २४ वी घटनादुरुस्ती मंजूर केली. त्याचप्रमाणे, पूर्वीच्या राजपुत्रांना दिले जाणारे संस्थानिकांचे तनखे काढून घेतल्याबद्दल सरकारने सर्वोच्च न्यायालयातील खटला गमावल्यानंतर, संसदेने २६ वी घटनादुरुस्ती मंजूर केली. यामुळे सरकारला संस्थानिकांचे तनखे रद्द करण्याच्या निर्णयाला घटनात्मक वैधता मिळाली आणि सर्वोच्च न्यायालयाचा आदेश रद्द झाला.

न्यायपालिका आणि कार्यकारी मंडळ यांच्यातील हा संघर्ष ऐतिहासिक केशवानंद भारती खटल्यात पुढे चालू राहिला, ज्यात २४ व्या घटनादुरुस्तीला आव्हान देण्यात आले. ७ विरुद्ध ६ अशा अगदी अल्प बहुमताने, सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने संविधानाची ' मूलभूत संरचना ' बदलण्यासाठी संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकाराचा वापर केला जाऊ शकत नाही, असे सांगून त्यावर निर्बंध घातले . त्यानंतर, पंतप्रधान गांधी यांनी केशवानंद भारती खटल्यातील अल्पमतात असलेल्या न्यायाधीशांपैकी सर्वात ज्येष्ठ न्यायाधीश ए.एन. रे यांना भारताचे सरन्यायाधीश बनवले. रे यांनी त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ असलेल्या तीन न्यायाधीशांना— जे. एम. शेलत , के. एस. हेगडे आणि ग्रोव्हर—यांना मागे टाकले, जे सर्व केशवानंद भारती खटल्यातील बहुमतात होते . इंदिरा गांधींच्या न्यायपालिकेवर नियंत्रण ठेवण्याच्या प्रवृत्तीवर प्रसारमाध्यमे आणि जयप्रकाश नारायण ('जेपी') यांसारख्या राजकीय विरोधकांकडून तीव्र टीका झाली. यामुळे काँग्रेस पक्षाच्या काही नेत्यांनी अधिक शक्तिशाली, थेट निवडलेल्या कार्यकारी मंडळासह अध्यक्षीय प्रणालीत आणीबाणी जाहीर करण्याची मागणी केली. अशा प्रकारच्या सुरुवातीच्या चळवळींपैकी सर्वात महत्त्वाची चळवळ म्हणजे डिसेंबर १९७३ ते मार्च १९७४ दरम्यान गुजरातमध्ये झालेली नवनिर्माण चळवळ. राज्याच्या शिक्षणमंत्र्यांविरुद्ध झालेल्या विद्यार्थी आंदोलनामुळे अखेरीस केंद्र सरकारला राज्य विधानमंडळ विसर्जित करण्यास भाग पडले, ज्यामुळे मुख्यमंत्री रक्षित गौतम यांना राजीनामा द्यावा लागला आणि राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली . दरम्यान, सार्वजनिक नेत्यांवर प्राणघातक हल्ले झाले, तसेच रेल्वेमंत्री ललित नारायण मिश्रा यांची बॉम्बस्फोटात हत्या झाली. या सर्व घटनांमुळे संपूर्ण देशात कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या वाढत असल्याचे दिसून आले, ज्याबद्दल गांधींच्या सल्लागारांनी त्यांना अनेक महिन्यांपासून सावध केले होते. मार्च-एप्रिल १९७४ मध्ये, बिहार सरकारविरोधात बिहार छात्र संघर्ष समितीने सुरू केलेल्या विद्यार्थी आंदोलनाला गांधीवादी समाजवादी जयप्रकाश नारायण ज्यांना जेपी म्हणून ओळखले जाते यांचा पाठिंबा मिळाला. एप्रिल १९७४ मध्ये, पाटणा येथे, जेपींनी 'संपूर्ण क्रांती'चे आवाहन केले आणि विद्यार्थी, शेतकरी व कामगार संघटनांना अहिंसक मार्गाने भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणण्यास सांगितले. त्यांनी राज्य सरकार बरखास्त करण्याची मागणीही केली, परंतु केंद्राने ती मान्य केली नाही. एका महिन्यानंतर, देशातील सर्वात मोठी संघटना असलेल्या रेल्वे-कर्मचारी संघटनेने देशव्यापी रेल्वे संप पुकारला. या संपाचे नेतृत्व अखिल भारतीय रेल्वेमन फेडरेशनचे अध्यक्ष असलेले जहाल कामगार नेते जॉर्ज फर्नांडिस यांनी केले. ते समाजवादी पक्षाचे अध्यक्षही होते. इंदिरा गांधी सरकारने हा संप क्रूरपणे दडपला, हजारो कर्मचाऱ्यांना अटक केली आणि त्यांच्या कुटुंबीयांना त्यांच्या निवासस्थानांतून हाकलून दिले. आपल्या भाषणात, नारायण यांनी मोरारजी देसाई यांना अध्यक्ष आणि नानाजी देशमुख यांना सचिव बनवून 'लोक संघर्ष समिती' स्थापन करण्याचा आपला निर्णय जाहीर केला. या समितीचा उद्देश पंतप्रधानांच्या घराला घेराव घालणे आणि सरकारचे कामकाज ठप्प करण्यासाठी कोणालाही आत प्रवेश नाकारणे हा होता. समितीने लोकांना रेल्वे मार्ग अडवण्यास सांगितले जेणेकरून गाड्या धावू शकणार नाहीत आणि न्यायालये व सरकारी कार्यालयांचे कामकाज थांबवता येईल.

## दिन विशेष

### तीन दशक रसिकांना आपल्या संगीताने भुरळ घालणारे मदन मोहन!




आज जयंती

मदन मोहन कोहली हे मदन मोहन या नावाने अधिक ओळखले जातात. हे १९५०, १९६० आणि १९७० च्या दशकातील एक भारतीय संगीत दिग्दर्शक होते. त्यांना हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात मधुर आणि कुशल संगीत दिग्दर्शकांपैकी एक मानले जाते .हिंदी चित्रपटांसाठी त्यांनी संगीतबद्ध केलेल्या अजरामर गझलांसाठी ते विशेषतः स्मरणात राहतात . त्यांच्या काही सर्वोत्कृष्ट रचना गायिका लता मंगेशकर, मोहम्मद रफी आणि तलत महमूद यांच्यासोबत आहेत. ज्या तीन गायकांसोबत त्यांनी आपल्या कारकिर्दीच्या बहुतेक काळात वारंवार काम केले.

२५ जून १९२४ रोजी बगदादमध्ये जन्मलेल्या मदन मोहन यांनी आपल्या आयुष्याची सुरुवातीची वर्षे मध्यपूर्वेत घालवली. त्यांचे वडील राय बहादूर चुनीलाल कोहली हे इराकी पोलीस दलात महालेखापाल म्हणून कार्यरत होते. १९३२ नंतर, त्यांचे कुटुंब ब्रिटिश भारतातील पंजाबच्या झेलम जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावी चकवालला परतले. त्यांचे वडील व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी मुंबईला गेले असताना, त्यांना एका आजी-आजोबांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले. पुढील काही वर्षे त्यांनी लाहोरमधील स्थानिक शाळेत शिक्षण घेतले. लाहोरमधील वास्तव्यादरम्यान, त्यांनी करतार सिंग नावाच्या व्यक्तीकडून अगदी थोड्या काळासाठी शास्त्रीय संगीताचे प्राथमिक शिक्षण घेतले, तथापि त्यांना संगीताचे कोणतेही औपचारिक प्रशिक्षण मिळाले नाही. काही काळानंतर, त्यांचे कुटुंब मुंबईला स्थलांतरित झाले, जिथे त्यांनी मुंबईतील बायकुला येथील सेंट मेरी स्कूलमधून आपले सिनियर केंब्रिज पूर्ण केले. मुंबईत, वयाच्या ११ व्या वर्षी, त्यांनी ऑल इंडिया रेडिओद्वारे प्रसारित होणाऱ्या मुलांच्या कार्यक्रमांमध्ये सादरीकरण करण्यास सुरुवात केली. वयाच्या १७ व्या वर्षी, त्याने डेहराडूनमधील कर्नल ब्राउन केंब्रिज स्कूलमध्ये प्रवेश घेतला जिथे त्याने त्याच्या शालेय शिक्षणाची शेवटची वर्षे पूर्ण केली.

ते १९४३ साली सेकंड लेफ्टनंट म्हणून सैन्यात दाखल झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपर्यंत त्यांनी दोन वर्षे तेथे सेवा केली. त्यानंतर त्यांनी सैन्य सोडून आपल्या संगीताच्या आवडी जोपासण्यासाठी मुंबईला परत आले. १९४६ मध्ये, ते ऑल इंडिया रेडिओ , लखनौ येथे कार्यक्रम सहाय्यक म्हणून रुजू झाले, जिथे त्यांचा उस्ताद फैयाज खान , उस्ताद अली अकबर खान, बेगम अख्तर आणि तलत महमूद यांसारख्या विविध कलाकारांशी संपर्क आला . या काळात ते ऑल इंडिया रेडिओवर प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांसाठी संगीत रचनाही करत असत . १९४७ मध्ये, त्यांची ऑल इंडिया रेडिओ, दिल्ली येथे बदली झाली, जिथे त्यांनी थोडा काळ काम केले. त्यांना गाण्याची खूप आवड होती आणि १९४७ मध्ये, त्यांना बेहजाद लखनवी यांनी लिहिलेल्या 'आने लगा है कोई नजर जलवा गर मुझे' आणि 'इस राज को दुनिया जानती है' या दोन गझला ध्वनिमुद्रित करण्याची पहिली संधी मिळाली. त्यानंतर लगेच, १९४८ मध्ये त्यांनी दीवान शरार यांनी लिहिलेल्या आणखी दोन खाजगी गझल रेकॉर्ड केल्या, 'वो आये तो महफिल में इथलाते हुए आये' आणि 'दुनिया मुझे कहती है के मैं तुझको भूल दूं'. १९४८ मध्ये, त्यांना शहीद चित्रपटासाठी संगीतकार गुलाम हैदर यांच्या नेतृत्वाखाली लता मंगेशकर यांच्यासोबत 'पिंजरे में बुलबुल बोले' आणि 'मेरा छोटासा दिल डोले' हे चित्रपट युगल गाण्याची पहिली संधी मिळाली, तरीही ही गाणी चित्रपटात कधीही प्रदर्शित किंवा वापरली गेली नाहीत. १९४६ ते १९४८ दरम्यान, त्यांनी दो भाईसाठी संगीतकार एसडी बर्मन आणि अभिनेत्री श्याम सुंदर यांना सहाय्य केले.

मोहन यांना १९५० मध्ये 'आँखें' या चित्रपटातून पहिली मोठी संधी मिळाली, ज्यात त्यांनी मुकेश आणि शमशाद बेगम यांच्यासोबत काम केले. येथूनच मोहम्मद रफी यांच्यासोबतच्या त्यांच्या दीर्घ सहकार्याची सुरुवात झाली . त्यांचा पुढचा चित्रपट 'अडा' (१९५१) होता, ज्यातून लता मंगेशकर यांच्यासोबतच्या सहकार्याची दुसरी मालिका सुरू झाली. कारण पुढे या दोघींनी त्यांच्या अनेक चित्रपटांसाठी गाणी गायली. मोहन यांनी या चित्रपटात किशोर कुमार यांच्यासोबतही काम केले. 'शराबी ' चित्रपटासाठी त्यांनी संगीतबद्ध केलेली दोन गाणी ; 'सावन के महिने में' आणि 'कभी ना कभी कोई', जी दोन्ही देव आनंद यांच्यासाठी चित्रित करण्यात आली होती, ती मोहम्मद रफी यांच्या सर्वात प्रसिद्ध गाण्यांपैकी आहेत.

मदन मोहन यांनी हेमंत कुमार यांच्यासोबतही काम केले, धून (१९५३) या चित्रपटासाठी कुमारसोबत पहिल्यांदा काम केले . हेमंत कुमार यांनी लता मंगेशकर यांच्यासोबत 'हम प्यार करेंगे' हे गाणे गायले. मदन मोहन यांनी पुन्हा हेमंत कुमार यांच्यासोबत मोहर (१९५९) चित्रपटासाठी 'खो गये जाने कहाँ' या गाण्यावर काम केले. साहेब बहादूर (१९७७) चित्रपटातील 'राही था मैं आवारा' या गाण्यासाठी त्याच्या मृत्यूपूर्वी मोहनची शेवटची रचना देखील किशोर कुमार यांनी गायली होती. संगीत दिग्दर्शक म्हणून त्यांनी महेंद्र कपूर यांच्यासोबत 'जेलर ' (१९५८) मध्ये पहिल्यांदा काम केले . मदन यांनी आपल्या संगीत रचनांसाठी अनेकदा गीतकार राजा मेहदी अली खान , कैफी आझमी , राजिंदर कृष्ण , साहिर लुधियानवी आणि मजरूह सुलतानपुरी यांच्यासोबत सहयोग केला. १९५७ मध्ये, त्यांनी देख कबीरा रोया चित्रपटाचा साउंडट्रॅक तयार केला , ज्यामध्ये प्रख्यात गायक मन्ना डे यांनी 'कौन आया मेरे मन के द्वार' ला आवाज दिला. त्या व्यतिरिक्त त्यांनी लता मंगेशकर यांना 'तू प्यार करे या थुकराए' आणि 'मेरी वीणा तुम बिन रोये' हे गाणे गायले होते, तर तलत महमूदने 'हम से आया ना गया' हे गाणे गायले होते. एकदा एका मुलाखतीत मन्ना डे यांनी आठवले की मदन मोहन यांनी त्यांना 'कौन आया मेरे मन के द्वार' चे रेकॉर्डिंग करताना विशेष काळजी घेण्यास सांगितले होते.

# भारताच्या इतिहासातील एक सुवर्ण क्षण : क्रिकेट विश्वचषक, १९८३

१९८३ क्रिकेट विश्वचषक (अधिकृत नाव १९८३ प्रुडेंशियल चषक) आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटन (आयसीसी) आयोजित क्रिकेट विश्वचषकाचे हे तिसरे आयोजन होते. ही स्पर्धा इंग्लंड आणि वेल्समध्ये ९ ते २५ जून १९८३ च्या दरम्यान खेळवली गेली. ही स्पर्धा प्रुडेंशियल इश्युरन्स कंपनी ने प्रायोजित केली व ह्या स्पर्धेत ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, भारत, न्यू झीलंड, पाकिस्तान, वेस्ट इंडीज श्रीलंका व झिम्बाब्वे या ८ संघांनी सहभाग घेतला. गट फेरीचे सामने ४ संघांच्या २ गटात खेळवले गेले. गट फेरीतील प्रमुख दोन संघ उपांत्य फेरीत गेले. या आधीची स्पर्धा इंग्लंडमध्ये चार वर्षांपूर्वी १९७९ साली झाली. मागील विजेते वेस्ट इंडीज संघ होता. सर्व सामने ६० षटकांचे होते व सर्व सामने दिवसा खेळवण्यात आले. इंग्लंड, पाकिस्तान, भारत व वेस्ट इंडीज संघ उपांत्य फेरीसाठी पात्र झाले. २५ जून १९८३ रोजी झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने वेस्ट इंडीज संघाला ४१ धावांनी हरवत विश्वचषक पटकावला.

साखळी सामन्यांसाठी ४ संघांचा १ गट बनवण्यात आला होता. या गटातील प्रत्येक संघ एकमेकाशी सामने खेळला व गटातील मुख्य दोन संघ दुसऱ्या गटातील प्रमुख दोन संघांसोबत बाद फेरीतील सामने खेळले. उपांत्य फेरीतील दोन सामने २२ जून रोजी खेळविण्यात आले.

**१) पहिला उपांत्य सामना**

पहिला उपांत्य सामना इंग्लंड क्रिकेट संघ वि भारत क्रिकेट संघ या दोन संघांमध्ये मँचेस्टर शहरातील ओल्ड ट्रॅफर्ड या मैदानावर झाला. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सामन्याच्या सुरुवातीला यजमान संघ भारतीय संघाला आरामात स्पर्धेतून बाहेर काढून टाकेल असे क्रिकेट तज्ञांचे मत



होते. परंतु भारतीय गोलंदाजांनी इतकी भेदक गोलंदाजी सुरू केली की इंग्लिंश फलंदाजांना चेंडू मारताच येईना, बॅटची कड लागून अनेक चेंडू भरकटायला लागले. इंग्लंड संघ भारतीय गोलंदाजी समोर टिकाव धरू शकला नाही आणि परिणामी इंग्लंड संघ २१३ धावांवर सर्वबाद झाला. ग्रेम फाउलर याने ५९ चेंडूत ३ चौकारांच्या मदतीने सर्वाधिक ३३ धावा केल्या तर भारताकडून कर्णधार कपिल देव याने ११ षटकांत ३५ धावा देत ३ गडी बाद केले. मोहिंदर अमरनाथ आणि रॉजर बिन्नी या दोघांनीही प्रत्येकी २ गडी बाद केले. इंग्लंडच्या २१३ धावांचा पाठलाग भारताने दणक्यात सुरू केला. यशपाल शर्मा आणि संदीप पाटीलच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने ५४.४ षटकांतच लक्ष्य गाठले आणि पहिल्यांदा क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात प्रवेश मिळवला. यशपाल शर्मा याने ११५ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ६१ धावा केल्या तर संदीप पाटील याने ३२ चेंडूत ८ चौकारांनिशी ५१ धावा केल्या. गोलंदाजीत १२ षटकांत २७ धावा देत २ गडी बाद करून आणि नंतर ९२ चेंडूत ४ चौकार आणि १ षटकाराच्या सहाय्याने ४६ धावा करत भारताच्या विजयात मोलाचा खेळ खेळणाऱ्या मोहिंदर अमरनाथ याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

**२) पहिला उपांत्य सामना**

वेस्ट इंडीज क्रिकेट संघ आणि पाकिस्तान क्रिकेट संघामध्ये १९८३ क्रिकेट विश्वचषकाचा दुसरा उपांत्य सामना २२ जून खेळविण्यात आला. लंडन शहरातील द ओव्हल मैदानावर हा सामना पार पडला. वेस्ट इंडीजने नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. वेस्ट इंडीजच्या भेदर माऱ्यासमोर पाकिस्ताननी संघ टिकाव धरू शकला नाही. मोहसीन खान याच्या अर्धशतकाच्या जोरावर पाकिस्तानला ६० षटकात १८४ धावांपर्यंतच मजल मारता आली. पाकिस्तानने ८ गडी गमावले. पाकिस्तानी डावात मोहसीन खानच अर्धशतक पूर्ण करू शकला. त्याने १७६ चेंडूत १ चौकाराच्या मदतीने ७० धावा केल्या. वेस्ट इंडीजकडून माल्कम मार्शल याने सर्वाधिक ३ गडी बाद केले. वेस्ट इंडीजने १८४ या छोट्या धावसंख्येचा पाठलाग अगदी धमाक्यात सुरू केला. उपकर्णधार सर व्हिव्हियन रिचर्ड्स याने ९६ चेंडूत ११ चौकार आणि १ षटकाराच्या सहाय्याने ८० धावा केल्या तर लॅरी गोम्सच्या ही महत्त्वपूर्ण अश्या ५० धावांच्या जोरावर ८ गडी राखत वेस्ट इंडीजने सामना जिंकला आणि गेल्या २ वेळचे विश्वविजेते असलेला वेस्ट इंडीज क्रिकेट संघ सलग तिसऱ्यांदा क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यासाठी पात्र ठरला.

**अंतिम सामना**

२५ जून १९८३ रोजी लॉर्ड्स मैदानावर १९८३ क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना झाला. वेस्ट इंडीजने नाणेफेक जिंकत पुन्हा एकदा क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. भारतीय फलंदाजांचे वेस्ट इंडीजच्या भेदक माऱ्यासमोर धिंडवडे निघाले. भारत ५४.४ षटकात १८३ धावांवर सर्वबाद झाला. भारताकडून कृष्णम्माचारी श्रीकांत याने सर्वाधिक ३८ धावा केल्या. वेस्ट इंडीजच्या अँडी रॉबर्ट्स, माल्कम मार्शल, जोएल गार्नर आणि मायकल होल्डिंग या गोलंदाजी चौकडीने भारतीय फलंदाजीचे तीनतेरा वाजवले. वेस्ट इंडीज संघ सलग तिसऱ्या विश्वविजेतेपदाकडे वाटलाच करु लागला. परंतु दुसऱ्या डावात वातावरणाचा पुरेपूर फायदा भारताला झाला. १८४ ही छोटी धावसंख्या पाठलाग करताना वेस्ट इंडीजला डोंगराएवढी वाटू लागली. खेळपट्टीच्या बदललेली स्थितीने भारतीय गोलंदाजांनी अतिशय भेदर गोलंदाजी सुरू केली. मोहिंदर अमरनाथ आणि मदनलाल या जोडीने ६ गडी बाद केले आणि ५२ षटकांतच वेस्ट इंडीज संघ केवळ १४० धावांवर बाद झाला. भारताने अशक्य कामगिरी शक्य करून दाखविली होती. २ वेळच्या विश्वविजेता वेस्ट इंडीज संघाला ४३ धावांनी हरवत भारताने पहिल्यांदाच क्रिकेट विश्वचषक जिंकला. मोहिंदर अमरनाथला सामनावीराचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार दि. २५ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# जय श्री श्यामच्या जयघोषात भव्य निशाण यात्रा ; शेकडो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग

प्रतिनिधी २५ जून

**अकोला :** ज्येष्ठ शुक्ल पक्ष एकादशीच्या पावन पर्वानिमित्त राजराजेश्वर नगरीतील श्रीश्याम भक्तांच्या वतीने गुरुवारी भव्य निशाण यात्रेचे आयोजन करण्यात आले. 'जय श्री श्याम'च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. शहरातील राणी सती धाम येथून प्रारंभ झालेली निशाण यात्रा तहसील कार्यालय, गांधी चौक, सिटी कोतवाली, खोलेश्वर, परशुराम चौक, सरकारी बगीचा व लक्झरी बसस्थानक मार्गे गीतानगर परिसरातील श्री रामदेव बाबा व श्री श्याम बाबा मंदिरात पोहोचली. यावेळी भाविकांनी खाटूनरेश श्री श्याम बाबांच्या चरणी आपले मनोरथ निशाण अर्पण करून सुख, शांती व संकट निवारणासाठी प्रार्थना केली. निर्जला एकादशी निमित्त मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता मंदिर व्यवस्थापनाच्या वतीने विशेष व्यवस्था करण्यात आली होती. श्री श्याम बाबांची आरती, श्रृंगार दर्शन व महाप्रसाद स्वरूपात फलाहार वितरण करण्यात आले. सायंकाळी विविध धार्मिक कार्यक्रमांसह भजन संध्याचे आयोजन करण्यात आले असून, शहरातील श्याम भक्तांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मंदिर व्यवस्थापनाने केले आहे.



### ओल्ड सिटी ग्रुपची भव्य पालखी यात्राही आकर्षणाचे केंद्र

दरम्यान, जुन्या शहरातील डाबकी रोड परिसरातील ओल्ड सिटी ग्रुपच्या वतीने गुरुवारी पहाटे ६ वाजता नंदाने मंगल कार्यालय येथून श्री श्याम बाबांची पालखी यात्रा काढण्यात आली. राजस्थानी पारंपरिक वेशभूषा परिधान केलेले शेकडो निशाणधारी श्यामप्रेमी या पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.डाबकी रोड, विठ्ठल मंदिर, काळा मारुती मार्गे ही पालखी सिटी कोतवाली परिसरात पोहोचली. येथे राणी सती मंदिरातून आलेल्या निशाण यात्रेसोबत ती सहभागी झाली. त्यानंतर दोन्ही यात्रा एकत्रितपणे श्री श्याम बाबांच्या भजनांच्या गजरात नृत्य, भक्ती व उत्साहाने श्री श्याम बाबा मंदिरात दाखल झाल्या. संपूर्ण मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते..

# निकृष्ट रस्त्यांनी घेतला दोन युवकांचा बळी

## ♦ कंत्राटदारांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

प्रतिनिधी २५ जून




**अकोट :** अकोला-आकोट व आकोट-शेगाव मार्गावरील निकृष्ट दर्जाच्या रस्ते बांधकामामुळे दोन युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा आरोप करत संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच मृत युवकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात अकोला-आकोट आणि आकोट-शेगाव हे दोन्ही मार्ग अत्यंत दयनीय अवस्थेत असून निकृष्ट साहित्याचा वापर, अपुरी दबाई आणि त्रुटीपूर्ण कामांमुळे रस्त्यांवर मोठमोठ्या भेगा व खड्डे पडल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले.

निवेदनानुसार, २१ जून रोजी आकोट-शेगाव मार्गावरील अंदुरा परिसरात रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगेत दुचाकीचे चाक अडकल्याने श्रीकांत पुरुषोत्तम बायस्कर आणि कुणाल राजेंद्र भोरे हे दोघे युवक एसटी बसखाली सापडून जागीच ठार झाले. या दुर्घटनेसाठी निकृष्ट दर्जाचे रस्ते काम आणि प्रशासनाची निष्क्रियता जबाबदार असल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे.

अकोला-आकोट मार्गाचे विस्तारीकरणाचे काम २०१७ पासून सुरू असून तब्बल नऊ वर्षे उलटूनही ते पूर्ण झाले नसल्याची बाबही निवेदनात अधोरेखित करण्यात आली आहे. या कालावधीत नागरिकांना धूळ, खड्डे आणि वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगण्यात आले. तसेच करारानुसार रस्त्यालगत वृक्षलागवड करणे बंधनकारक असतानाही कंत्राटदाराने एकही झाड लावले नसल्याचा आरोप करण्यात आला.

दरम्यान, रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब असतानाच अकोला-आकोट मार्गासह निंबा फाटा आणि आकोट-शेगाव मार्गावर टोल प्लाझा सुरू करण्याची प्रक्रिया सुरू असल्याबद्दलही संताप व्यक्त करण्यात आला. रस्त्यांची दुरुस्ती न करता टोल वसुली करणे म्हणजे जनतेची लूट असल्याचे शिवसेनेचे म्हणणे आहे. मागण्यांवर सात दिवसांच्या आत ठोस कार्यवाही न झाल्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकर, जि.प. सदस्य जगन निचळ, संतोष बायस्कर, सुदर्शन बायस्कर, अरुण लोणकर, दादाराव सोळुंके, सोमेश इंगोले, यश चांदूरकर, कुंदन वालशिंगे, अथर्व निचळ, रोहित महल्ले, दिशांत धनद्रव्य, प्रशांत सोनटक्के, प्रशांत परनाटे, धीरज शिरसाट, सागर हागे, विलास तवर, नितीन संगोले, प्रमोद मुरूमकर यांच्यासह शिवसैनिक आणि मृत युवकांचे नातेवाईक उपस्थित होते.

# सोशल मीडियावरील आक्षेपार्ह व्हिडिओ विरोधात पातूर पोलीस ठाण्यात तक्रार

प्रतिनिधी २५ जून

**पातूर :** सोशल मीडियावर मुस्लिम धर्म, समाज तसेच पैगंबर मोहम्मद साहेब आणि त्यांच्या पत्नी यांच्याविषयी कथितरित्या आक्षेपार्ह व समाजात तेढ निर्माण करणारे व्हिडिओ प्रसारित केल्याप्रकरणी एका महिले विरोधात पातूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पातूर येथील जमात रजा ए मुस्तफा यांच्या वतीने ही तक्रार देण्यात आली आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, संबंधित महिला सोशल मीडियावर मुस्लिम धर्म, पैगंबर मोहम्मद साहेब तसेच त्यांच्या पत्नी यांच्याबाबत कथितरित्या खोटे, काल्पनिक आणि आक्षेपार्ह विधान करून व्हिडिओ प्रसारित करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधित महिलेविरुद्ध योग्य कारवाई करून गुन्हा दाखल करावा अशी मागणी तक्रारदारांनी पातूर पोलीस प्रशासनाकडे केली आहे. या तक्रारीची पोलीस प्रशासनाकडून पडताळणी व चौकशी सुरू असून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुंडगावच्या गजानन महाराज पालखीचे अकोल्यात स्वागत

प्रतिनिधी २५ जून

**अकोला :** श्री गजानन महाराज पादुका संस्थान मुंडगाव येथून श्री गजानन महाराज पालखी अकोला येथे आली. गेल्या २५ वर्षापासून ही परंपरा सुरू आहे. दुपारी बारा वाजताच्या जवळपास अकोला येथे राजू अग्रवाल यांच्या घरी थांबून सगळ्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. पालखीचे जोरदार स्वागत करण्यात आले. मुंडगावला संत गजानन महाराज यांच्या मूळ पादुका आहेत. ज्या त्यांनी पुंडलिक भोकरे या भक्ताला दिल्या होत्या तसेच १९०८ यावर्षी महाराज तिथे गेले असताना महाराजांचे रथ सुद्धा संस्थानमध्ये आहे.



# अडगांव बु. येथे मोहरमनिमित्त शांतता समितीची सभा

प्रतिनिधी २५ जून

**अडगांव बु :** आगामी मोहरर्म उत्सवाच्या पार्श्वभूमीवर, हिवरखेड पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येत असलेल्या अडगांव बु येथे 'शांतता समितीची सभा' २३ जुनला ग्रामपंचायत सचिवालयात उत्साहात संपन्न झाली. आगामी दि.जुन २८ रोजी मोहरम उत्सव शांततेत, एकोप्याने आणि कायदे-सुव्यवस्थेचे पालन करून साजरा व्हावा, हा या सभेचा मुख्य उद्देश होता. या सभेला उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील आणि हिवरखेड ठाणेदार सचिन पाटील, श्री मनोहरलाल फाफट, पोलीस पाटील हितेश हागे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी दोन्ही अधिकाऱ्यांनी उपस्थित मोहरम मंडळाच्या अध्यक्षांना आणि कार्यकर्त्यांना उत्सव साजरा करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. 'मोहरम हा उत्सव शांततेच्या आणि उत्साहात पार पाडावा,' असे आवाहन पोलीस व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी यावेळी केले. तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वांनी पोलिसांना सहकार्य करावे, अशी विनंतीही त्यांनी केली. या महत्त्वपूर्ण सभेला अडगांव बु गावातील शांतता समितीचे डॉ.मनमोहन व्यास, अशोक घाटे, संजय राजनकार, गजानन मुंगसे, शहीद खाँ, म.युसुफ भाई, अफरोज खा पत्रकार माणिकराव घाटे, नाना देशमुख, विलास वानखडे, राजु रोहणकार, सर्व सदस्य, स्थानिक पत्रकार, गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि मोठ्या संख्येने मोहरम उत्सव समितीचे सदस्य मंडळी उपस्थित होती.



# वरूर गावच्या नागरिकांचे उपोषण मागे

## ♦ संबंधित विभागाकडून कारवाईचे लेखी आश्वासन

प्रतिनिधी २५ जून

**अकोट:** तालुक्यातील वरूर गावच्या प्रभाग क्रमांक १ मधील सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यासाठी गावकऱ्यांनी पंचायत समिती अकोट कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. संबंधित विभागाने उपोषणाची दखल घेत ७ दिवसांत अतिक्रमण हटवण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.

अकोट तालुक्यातील वरूर गावच्या सार्वजनिक रस्त्यावर गेल्या काही वर्षांपासून अतिक्रमण करण्यात आले होते, ज्यामुळे गावकऱ्यांना येण्या-जाण्यासाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. हे अतिक्रमण हटवण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाकडे लेखी तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात होते. या प्रशासकीय दुर्लक्षामुळे त्रस्त होऊन गावचे अनंत धनबहादुर आणि ॲड. भूषण धनबहादुर यांनी २२ जूनपासून पंचायत समिती अकोट कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. मात्र, सुरुवातीला संबंधित विभागाने या उपोषणाकडेही दुर्लक्ष केल्याचा आरोप उपोषणाला बसलेल्या धनबहादुर बंधूंनी केला.




परंतु, गावकऱ्यांचा वाढता दबाव पाहता अखेर दुसऱ्या दिवशी प्रशासनाला या उपोषणाची दखल घ्यावीच लागली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी उपोषण स्थळी भेट देऊन चर्चा केली आणि ७ दिवसांच्या आत अतिक्रमण हटवण्याचे लेखी आश्वासन दिले. या आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. जर ७ दिवसांत अतिक्रमण हटवले नाही, तर याहून अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

# एल–निनो च्या पार्श्वभूमीवर सुकोडा व खडकी गावामध्ये खरीप पूर्व शेतकरी मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी २५ जून

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी वि?द्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या संकल्पनेतून तसेच डॉ.एस.एस. माने संशोधन संचालक यांच्या मार्गदर्शनात व डॉ. अनिता चोरे (प्रमुख शास्त्रज कोरडवाहू शेती तथा विभाग प्रमुख कृषिवि?द्या) यांच्या नियोजनातून शेतकरी शास्त्रज्ञ मंच व खरीप पूर्व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. एल-निनो व त्याचा खरीप हंगामावर होणारा परिणाम या विषयास अनुसरून सुकोडा व खडकी येथे १९ जून रोजी कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प आणि अ.भा.स.तन व्यवस्थापन विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि अकोला खरीप पूर्व शेतकरी मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. राजेश पातोडे, वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा विभाग प्रमुख जल व मृद संधारण अभियांत्रिकी, डॉ. व्ही. व्ही. गौड, वरीष्ठ शास्त्रज्ञ कृषीविद्या, सुकोडा व खडकी येथील सरपंच, उप-सरपंच व गावकऱ्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस हारार्पण तसेच दीप प्रज्वलन करून करण्यात आली. डॉ. व्ही. व्ही. गौड यांनी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यांनी जैविक बीज प्रक्रियाचे महत्व व जैविक बीज प्रक्रिया करण्याची पद्धत या बददल शेतकर्यांना माहिती दिली. त्यांनी माती परीक्षण करणे व मृदा आरोग्य पत्रिके नुसार शिफारशीत खत मात्रेचा वापर करणे, शेणखताचा वापर, कंपोष्ट खत तयार करण्याच्या पद्धती व हिरवळीचे खत या ब?द्दल शेतकऱ्यांना तंत्रज्ञान अवगत केले. डॉ. राजेश पातोडे यांनी शेतकऱ्यांना एल-निनो व त्याचा पाऊसमानावर होणारा परिणाम या बद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन व जैविक बांध या ब?द्दल सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. रविकिरण माळी यांनी कोरडवाहू एकात्मिक शेती पद्धती बद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. श्री. गोपाल साखरकर, यांनी कृषी हवामाना विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच ७०-८० मी.मी. पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये असे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले. उपस्थित शेतकऱ्यांनी शेतीविषयी मनोगत व्यक्त केले व कोरडवाहू शेती संशोधन केंद्राच्या शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन मिळत असल्याब?द्दल समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून बियाणे बीज प्रक्रिया करण्या करिता विद्यापीठाने निर्मित केलेल्या पी.डी. के. व्ही. बायो कान्सोशिया व कोरडवाहू शेती तंत्रज्ञानाच्या घडी पत्रिका शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आल्यात जेणेकरून जैविक जीवाणू द्रव्यांच्या बीज प्रक्रीये ब?द्दल शेतकऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण होईल. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्याकरिता, पवन फुकट, मंगेश सोळंके (कृषी सहाय्यक), अभिजित मोहोड, सुकोडा व खडकी येथील गावकरी यांनी परिश्रम घेतले.



# राज्यातील सर्व माध्यमांच्या पूर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंत शाळा सकाळी ९ वाजेपासून सुरू होणार

प्रतिनिधी २५ जून

**अकोला :** राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनाच्या पूर्व प्राथमिक ते इयत्ता चवथी पर्यंत च्या शाळा सकाळी ९ वाजेपूर्वी कोणत्याही परिस्थितीत सुरू करू नये असे आदेश शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिले आहे. अकोल्यातील पत्रकार गणेश कुरई आणि शेखर पुर्णये यांनी पत्र पाठवून शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्याला यश आले आहे. गणेश कुरई व शेखर पुर्णये शिवाजी नगर यांनी राज्यातील सर्व माध्यमाच्या व व्यवस्थापनाच्या (शासकिय, खाजगी, अनुदानीत, विना अनुदानित) बालवाडी, अंगणवाडी, पुर्व-प्राथमिक तसेच वर्ग १ ते ४ पर्यतच्या शाळा सकाळी ९.०० वाजेपुर्वी कोणत्याही परिस्थितीत सुरु करु नयेत असे पत्र पाठवले होते. शासन परिपत्रकानुसार, राज्यातील आधुनिक युगातील बदललेली जीवनशैली, अपुरी झो आणि त्याचा विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारा नकारात्मक परिणाम लक्षात घेऊन शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. या परिपत्रकातील तरतुदीनुसार, जिल्ह्यातील सन माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधील पूर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरवण्याची वेळ सकाळी ९.०० किंवा ९.०० नंतर ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

**चंद्रकांत मांडेकर**



**अकोला :** एसटीच्या आगार क्र. १ चे कर्मचारी चंद्रकांत मांडेकर ५७ यांचे २३ जूनला निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी व मोठा आप्तपरिवार आहे.

**इंदुताई काकड**



**बार्शीटाकळी :** तालुक्यातील मांगुळ येथील इंदुमती दिगंबर काकड ८१, यांचे १९ जून रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, एक मुलगी आणि मोठा आप्तपरिवार आहे.

## जाहीरनामा

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अकोट यांचे कार्यालय**

दिनांक :- २२/०६/२०२६

मौजे जितापूर प्र. अडगांव व इतरत्र लोकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, अर्जदार श्री. रघुनाथ काशिनाथ भिमटे, रा. जितापूर प्र. अडगांव, ता. अकोट यांनी या कार्यालयात अर्ज करुन, मुंबई कुळ वहिवाट व शेत जमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम १९५८ चे कलम १९ अन्वये मौजे जितापूर प्र. अडगांव, स. नं. १४२ क्षेत्र २.८२ हे. आर. शेताचे सातबारा मधील इतर अधिकार या रकान्यातील साधे कुळ ''लक्ष्मण सिताराम रु. १३७ व ८०'' ''महसुल व वन विभाग दि. २२.१०.७५ प्रमाणे हस्तांतरणास बंदी'' '' कमाल नागरी जमीन अन्वये हस्तांतरणास बंदी'' असा असलेला शेरा कमी करण्याबाबत विनंती केली आहे.

अर्जदारास उपरोक्त प्रमाणे सातबारा मधील इतर अधिकार रकन्यातील उक्त शेरा कमी करण्याबाबत कुणाची काही हरकत / आक्षेप असल्यास हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपली हरकत / आक्षेप लेखी स्वरुपात दाखल करावी. मुदतीनंतर आलेली हरकत / आक्षेप ग्राह धरली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार, अकोट**

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226

**मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**

**गायत्री नगर. अकोला**

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

**इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.**

- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

**वैशिष्ट्ये :**

- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा



पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

गुरुवार, दि. २५ जून २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


## नेर डाक कार्यालयात खातेदारांना दिली जाते उद्धट वागणूक

प्रतिनिधी २५ जून

**नेर :** येथील डाक कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांच्या असहकार्याच्या खातेदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत उद्धट आणि वर्तवणुकीमुळे आहे. पीएम किसान सन्मान निधी, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना तसेच इतर शासकीय योजनांचे पैसे खात्यात जमा झाले आहेत का, याबाबत माहिती घेण्यासाठी येणाऱ्या खातेदारांना समाधानकारक माहिती मिळत नसल्याच्या तक्रारी आहे. चौकशीसाठी या कार्यालयात गेल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांकडून टाळाटाळ केली जाते. 'आम्हाला माहिती नाही', 'ऑनलाइन संपर्क साधा', 'आमच्याकडे वेळ नाही' अशा प्रकारची उत्तरे देऊन नागरिकांना परत पाठविले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे अनेकांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असून मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागत आहे. ही समस्या केवळ योजनांच्या लाभार्थ्यांपुरती मर्यादित नसून बचत खातेधारक, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच इतर ग्राहकांनाही अशाच अनुभवांना सामोरे जावे लागत असल्याचे सांगितले जात आहे.

# 12 हजार उमेदवार देणार 'टीईटी'; 47 केंद्रांवर परीक्षा

### गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी काटेकोर नियोजन : मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष देण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

प्रतिनिधी २५ जून

**यवतमाळ :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने २८ जून रोजी होणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) जिल्ह्यातील ४७ केंद्रांवर पार पडणार असून, या परीक्षेसाठी १२ हजार ४५ उमेदवार बसणार आहेत. परीक्षा पारदर्शक, निःपक्षपाती आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले.




टीईटी परीक्षेच्या पूर्वनियोजना संदर्भातील आढावा बैठक बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे झाली. यावेळी शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा, किशोर पागोरे, प्राचार्य डॉ. रमेश राऊत, उपशिक्षणाधिकारी नीता गावंडे, डॉ. शिल्पा पोलपेल्लीवार, वंदना नाईक, योगेश डाफ, गटशिक्षणाधिकारी राजू मडावी, प्रणिता गाढवे, प्रशासन अधिकारी विनोद डवले, विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख उपस्थित होते.

> ■ जिल्ह्यात टीईटीच्या पहिल्या आणि दुसऱ्या पेपरसाठी ५१५ कक्षांमध्ये बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी १२ झोनल अधिकारी, ४७ सहाय्यक परिरक्षक, ४७ केंद्र संचालक, १०२ पर्यवेक्षक, २४१ समवेक्षक तसेच ८९ शिपाई व लिपिकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घेण्याबरोबरच परीक्षार्थींसाठी बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी आणि अन्य मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. परीक्षार्थींची कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी शिक्षण विभागाने समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, नव्या शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर शाळांनी प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करावा, तसेच 'मिशन कॉम्पिटिटिव्ह एक्सलन्स' उपक्रम प्रभावीपणे राबवून शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांना यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही जिल्हाधिकारी मीना यांनी केले.

उपशिक्षणाधिकारी नीता गावंडे यांनी केंद्र संचालक आणि झोनल अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांसह परीक्षा व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. सेवेत असलेल्या शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी तसेच नव्याने शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी टीईटी परीक्षा महत्त्वाची असल्याने तिचे नियोजन अत्यंत काटेकोरपणे करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## फायरिंग प्रकरणात दोन आरोपींना अटक

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी २५ जून

**पुसद :** वसंतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिसरात झालेल्या फायरिंग प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासांत दोन आरोपींना अटक केली.

अब्दूल वाजिद अब्दूल रऊफ (वय ४०) आणि अब्दूल राजीक अब्दूल रऊफ (वय ३३), रा. रहेमनगर, वसंतनगर, पुसद अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ जून रोजी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाजवळ दोन गटांमध्ये वाद होऊन हाणामारी झाली. यावेळी एका गटाकडून गावठी पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. त्यानंतर गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

या प्रकरणी फिर्यादी वजाहद अली खान ऊर्फ अंजूम खान लियाकत अली खान यांच्या तक्रारीवरून अब्दूल वाजिद अब्दूल रऊफ, अब्दूल राजीक अब्दूल रऊफ आणि शेख फहिम शेख करीम यांच्याविरुद्ध वसंतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे २४ जून रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास सहारा पार्क गार्डन, वसंतनगर परिसरात छापा टाकून अब्दूल वाजिद अब्दूल रऊफ (वय ४०) आणि अब्दूल राजीक अब्दूल रऊफ (वय ३३), रा. रहेमनगर, वसंतनगर, पुसद यांना अटक करण्यात आली. त्यानंतर दोघांनाही पुढील तपासासाठी वसंतनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे आणि वसंतनगरचे पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक धिरज बांडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष गावंडे, पोलीस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे, पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड, सहाय्यक फौजदार मुन्ना आडे, सहाय्यक फौजदार संतोष भोरगे, पोलीस हवालदार तेजाब रणखांब, पोलीस हवालदार सुभाष जाधव, पोलीस हवालदार कुणाल मुंडोकार, पोलीस हवालदार रमेश राठोड, पोलीस हवालदार बबलू चव्हाण, पोलीस हवालदार मिथून जाधव, पोलीस नाईक अमित झेंडेकर, पोलीस नाईक महेश वाकोडे, पोलीस शिपाई सुनील पंडागळे, चापोउपनिरीक्षक रविंद्र शिरामे, चापो नाईक विवेक पेटे आणि चापो शिपाई राजेश जाधव यांनी सहभाग घेतला.

या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुगत पुंडगे करीत आहेत.

## शनिवारी १० वी-१२ वीच्या गुणवंतांचा सत्कार सोहळा

### पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते विद्यार्थी व पालकांचा होणार गौरव

प्रतिनिधी २५ जून

**दिग्रस :** दिग्रस शहर व तालुक्यातील दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या शेकडो गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा शनिवार, २७ जून रोजी सकाळी ११ वाजता दारव्हा रोडवरील बसस्थानकासमोरील राजेश्वर मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री आणि दिग्रस मतदारसंघाचे आमदार ना. संजय राठोड यांच्या हस्ते हा सोहळा पार पडणार असून विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

दहावी व बारावीच्या शालांत परीक्षेत ७५ टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे.



यंदाही गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या यशामागे मोलाची भूमिका बजावणाऱ्या पालकांचाही यावेळी सत्कार होणार आहे. पालकांनी घेतलेले कष्ट, दिलेले मार्गदर्शन आणि केलेला त्याग समाजासमोर यावा, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले. दिग्रस शहर व तालुक्यातील विविध शाळांकडून ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी प्राप्त झाली असून, सर्व गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्या पालकांसह उपस्थित राहून सत्काराचा मान स्वीकारावा, असे आवाहन शिवसेना, युवा सेना, विद्यार्थी सेना, युवती सेना आणि शिवसेना महिला आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

शैक्षणिक गुणवत्ता, परिश्रम आणि यशाचा गौरव करणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, दिग्रस तालुक्यातील शैक्षणिक वातावरण अधिक सकारात्मक आणि स्पर्धात्मक बनविण्यास अशा उपक्रमांची मोठी मदत होत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## मृग नक्षत्र संपताच पावसाची हजेरी; खरीप पेरण्यांना वेग

प्रतिनिधी २५ जून

योगेश मडावी

**झरी जामणी :** मृग नक्षत्राचा कालावधी संपताच झरी जामणी तालुक्यासह परिसरात पावसाने हजेरी लावली असून शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या पेरणीच्या कामांना वेग दिला आहे. २२ जूननंतर झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा बळावल्या आहेत.

यंदा मान्सूनच्या सुरुवातीला पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत होते. पेरणीसाठी आवश्यक ओलावा नसल्याने अनेकांनी शेतीची कामे थांबवून ठेवली होती. मात्र गेल्या दोन दिवसांत झालेल्या पावसामुळे शेतजमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाला असून शेतकरी मोठ्या उत्साहाने शेतांकडे वळले आहेत. पहिल्या चांगल्या पावसानंतर सोयाबीन, कापूस, तूर आदी पिकांच्या पेरणीला सुरुवात झाली आहे. बैलजोडी, ट्रॅक्टर आणि विविध कृषी अवजारांच्या आवाजाने शिवार पुन्हा गजबजून गेले आहे. अनेक शेतकऱ्यांनी पेरणी पूर्ण केली असून उर्वरित शेतकरीही हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन पेरणी करत आहेत. गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि दुष्काळी परिस्थितीचा फटका बसल्याने शेतकरी यंदाही सावध भूमिका घेत आहेत. तरीही सध्याच्या पावसामुळे त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे. पावसाने अशीच नियमित साथ दिल्यास खरीप हंगाम भरघोस होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. झरी जामणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मनात सध्या एकच प्रार्थना आहे. - "यंदा पाऊस भरभरून पडावा आणि शेतीला सुगीचे दिवस यावेत."

## सामाजिक उपक्रमांनी महेश नवमी उत्सव

प्रतिनिधी २५ जून

**उमरखेड :** माहेश्वरी समाजाचा वंश उत्पत्ती दिवस म्हणून ओळखला जाणारा महेश नवमी उत्सव उमरखेड येथे विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. स्व. शेठ गो. सो. सारडा राजस्थानी भवन येथे 13 जून ते 23 जून या कालावधीत 11 दिवसीय महेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

महेशोत्सवानिमित्त बालसंस्कार शिबिर, विविध क्रीडा स्पर्धा, व्यापार क्षेत्रातील समस्यांवर चर्चासत्र, आनंदमेळा, जगदंबा देवी टेकडीवरील स्वच्छता अभियान, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, शिवभजन स्पर्धा, रक्तदान शिबिर आणि रक्त तपासणी शिबिर अशा अनेक सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व



कार्यक्रमांमध्ये समाजातील महिला, पुरुष, युवक आणि बालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

23 जून रोजी महेश नवमीच्या दिवशी सकाळी बसवेश्वर संस्थान, शिवाजी वॉर्ड येथील महादेव मंदिरात पूजन व अभिषेक करून उत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर शासकीय रुग्णालयात फळवाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

दुपारी चार वाजता शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शिवनामाच्या गजराने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. शोभायात्रेत माहेश्वरी समाजातील अबालवृद्ध, युवक व महिलांनी पारंपरिक राजस्थानी वेशभूषेत सहभाग घेत शहरवासियांचे लक्ष वेधून घेतले. मिरवणुकीच्या मार्गावरील विविध महापुरुषांच्या पुतळ्यांना व मंदिरांमध्ये मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

सायंकाळी आयोजित मुख्य समारंभात यवतमाळ जिल्हा माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष विजयानंद भुतडा अध्यक्षस्थानी होते, तर प्रसिद्ध प्रेरक वक्ते कमलजी बागडी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी सामाजिक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले तसेच विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी यंदाचा 'महेश भूषण' पुरस्कार उमरखेडचे माजी नगराध्यक्ष स्व. सुरेशचंद्र जेठमलजी माहेश्वरी यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. त्यांच्या कुटुंबीयांनी हा सन्मान स्वीकारला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप भट्टड यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. गोपाल भराडे यांनी केले. महाआरती आणि महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

महेशोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी विनोद तेला, गोकुळ सारडा, राजकुमार भंडारी, आनंद तेला, गोविंद सोमाणी, दिलीप सारडा, कमल भट्टड, मनोज माहेश्वरी, कैलास भंडारी, अनुप काबरा, आशिष बंग, प्रमोद बजाज, आयुष बाहेती, शुभम बंग, लता माहेश्वरी, कीर्ती भट्टड तसेच युवा कार्यकारिणी व महिला कार्यकारिणीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.


**महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग तहसिलदार महागांव यांचे कार्यालय, महागांव**

Email id- tgp.mahagoan@gmail.com

दुरध्वनी क्रमांक 07236-222238

क्रमांक/म.स./जन्म नोद/कावि/360/2026

दिनांक 09/06/2026

**जाहीरनामा**

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि, अर्जदार सुमेधा समीर नागपुरे रा. फुलसावंगी यांनी त्यांचे आजोबा करीता नामे श्री अंबादास तुकाराम कोहाड यांचा जन्म मौजा फुलसावंगी ता. महागांव येथे दिनांक 20. 07. 1918 रोजी जन्म झाला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद मौजा सचिव ग्राम पंचायत फुलसावंगी येथे नसल्यामुळे महाराष्ट जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (03) अन्वये सचिव ग्राम पंचायत फुलसावंगी यांना जन्म नोंद घेणे बाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात दिनांक 23/06/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

शिक्का

**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**


## महागावचे पीआय सुनील अंबोरे ठरले 'खाकीतील देवदूत'

### अपघातग्रस्त पाच जणांना वेळेत मिळवून दिले उपचार

प्रतिनिधी २५ जून

**महागाव :** अपघातग्रस्तांना वेळेवर मदत मिळाल्यास जीव वाचू शकतात, याची प्रचिती महागाव येथे पुन्हा आली. महागाव पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुनील अंबोरे यांनी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातातील पाच जखमींना तत्काळ रुग्णालयात दाखल करून माणुसकीचे दर्शन घडविले. त्यांच्या या कार्यामुळे परिसरात त्यांचे कौतुक होत आहे.

बुधवारी (ता. २४) पहाटे तीनच्या सुमारास महागाव बायपासवरील भिसे पेट्रोल पंपासमोर एमएच-१३ ईएस-७७५० क्रमांकाची एर्टिगा कार झाडावर आदळली. अपघातात सुदर्शन ढाकू राठोड, सावन शिवराज पवार, अजित शिवा पवार, आदित्य गोविंद जाधव व सहा महिन्यांची गर्भवती सुप्रिया सावन पवार हे गंभीर जखमी झाले. सर्वजण सोलापूर जिल्ह्यातील प्रतापनगर तांडा येथील रहिवासी आहेत.



घटनेची माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्या वेळी रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने पोलीस निरीक्षक अंबोरे यांनी शासकीय वाहनासह खासगी वाहनांची मदत घेत सर्व जखमींना पुसद येथील मेडिकेअर रुग्णालयात दाखल केले. वेळेत उपचार मिळाल्याने सर्वांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

पोलीस निरीक्षक अंबोरे यांनी यापूर्वीही अनेक अपघातग्रस्तांना मदत केली आहे. वणी येथील पावडे कुटुंबाच्या अपघातावेळी तसेच एका महिलेची प्रकृती अचानक बिघडल्यावरही त्यांनी तत्परता दाखविली होती.

कायदा - सुव्यवस्थेसोबतच नागरिकांच्या जीवितरक्षणासाठी धावून जाणाऱ्या पोलीस निरीक्षक अंबोरे यांच्या कार्यामुळे पोलिस दलाची संवेदनशील बाजू पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## सलग दुसऱ्यांदा जिल्हा चॅम्पियन

### शलाका मुगवानकरची बॅडमिंटनमध्ये सुवर्ण कामगिरी



प्रतिनिधी २५ जून

**यवतमाळ :** महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनतर्फे आयोजित यवतमाळ जिल्हा खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत १३ वर्षांखालील गटात जेट किड्स इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी शलाका मंगेश मुगवानकर हिने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावत जिल्हा चॅम्पियन होण्याचा मान मिळविला आहे.

अंतिम सामन्यात दमदार खेळाचे प्रदर्शन करत शलाकाने प्रतिस्पर्ध्यावर मात केली. गेल्या चार वर्षांपासून सातत्यपूर्ण सराव आणि कठोर मेहनतीच्या बळावर तिने हे यश संपादन केले असून, जिल्हास्तरावरील बॅडमिंटन क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आपल्या यशाचे श्रेय शलाकाने प्रशिक्षक तथा वडील मंगेश मुगवानकर, आई कविता मुगवानकर, रितेश मुगवानकर, सपना मुगवानकर तसेच 8 वंडर्स बॅडमिंटन ग्रुप यांना दिले आहे. कुटुंबीय आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना तिने व्यक्त केली.

शलाकाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जेट किड्स इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या मिनी कुरूप, उमेश विठ्ठलकार, योगेश शुक्ला, गिरी हातामोडे आणि अजहर सर यांनी तिचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. जिल्हास्तरावर सलग दुसऱ्यांदा विजेतेपद मिळवत शलाकाने यवतमाळच्या क्रीडा क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला असून तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.


**नगर पंचायत कार्यालय, महागांव**

**ता. महागाव, जि. यवतमाळ**

कार्यालय - ०७२३६-२२२२८८

ई-मेल - npmahagaon@gmail.com

जा. क्र. नपम/प्रवि/आवि/२१७/२०२६

दिनांक :- २४/०६/२०२६

**ई-निविदा सुचना (दुसरी वेळ)**

नगर पंचायत महागांवच्या आरोग्य विभागातंर्गत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०१६ अंतर्गत महागांव शहरातील घरोघरी जावून दैनंदीन विलगीकृत कचरा संकलन करणे, संकलीत केलेला कचरा घनकचरा व्यवस्थापन केंद्र पर्यंत वाहतुक करणे तसेच शहरात दैनंदीन आवश्यक्तेनुसार नाले साफसफाई करणे इ. कामे १ वर्षासाठी ठेका पध्दतीने करणे करिता (Tender ID 2026_DMA_1301515_2) ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा बाबतच्या संविस्तर अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदाचे अधिकृत संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in वर दि. २४/०६/२०२६ पासुन पहावयास उपलब्ध आहे.

**स्वा./-**
**(सौ. रंजना दि. आडे)**
**अध्यक्षा, नगर पंचायत महागांव**

**स्वा./-**
**(श्री. प्रमोद रा.भरवाडे)**
**उपाध्यक्ष, नगर पंचायत महागांव**

**स्वा./-**
**(सौ. सुनिता शि. डाखोरे)**
**सा.आरोग्य सभापती, नगर पंचायत महागांव**

**स्वा./-**
**(डॉ. अजय कुरवाडे)**
**मुख्याधिकारी, नगर पंचायत महागांव**

# सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. २५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## २६ जुन रोजी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ ाचा 'परशुराम रत्न' आणि 'गुणवंत विद्यार्थी गौरव पुरस्कार' वितरण समारंभ

**अमरावती :** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, अमरावती शहर/जिल्हा ही संस्था गेल्या दोन दशकांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर राहून कार्य करत आहे. आपल्या कार्याची हीच परंपरा कायम राखत, दरवर्षीप्रमाणे यावर्षीही अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, अमरावती शहर/जिल्हा द्वारे 'परशुराम रत्न' आणि 'गुणवंत विद्यार्थी गौरव पुरस्कार' २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा दिनांक २६ जून २०२६ रोजी श्री. नागेश्वर मंदिर, कोल्हटकर कॉलनी, गणेश कॉलनीजवळ, अमरावती येथे सायंकाळी ०४:०० वाजता संपन्न होईल. 'परशुराम रत्न' पुरस्कार या श्रेणीत सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, उद्योग, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आदरणीय सदस्यांचा सत्कार केला जाईल.

# विदर्भातील सिंचन, उद्योग व रोजगाराचा अनुशेष भरून काढण्यासाठी वैधानिक विकास महामंडळाचे पुनर्गठन कधी करणार- आ. सुलभा खोडके

## प्रादेशिक समतोल राखणेसह विदर्भाचा वाढता अनुशेष दूर करण्याबाबत आ. सुलभा खोडके यांनी मांडली लक्षवेधी

प्रतिनिधी २५ जून

**अमरावती :** राज्यातील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी शासनाच्या वतीने विदर्भ ,मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. मात्र वर्ष २०२० मध्ये मंडळाची मुदत संपुष्ठात येऊन सुद्धा अद्यापही वैधानिक मंडळाचे पुनर्गठनास झालेल्या विलंबामुळे मागास भागांच्या विकासासंबंधी धोरणात्मक निर्णय प्रक्रिया प्रभावित झाली आहे. राज्यातील सिंचन, उद्योग, पायाभूत सुविधा , रोजगार अशा सर्वच बाबतीत निर्माण झालेल्या अनुशेष भरून काढण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने काय कार्यवाही करण्यात आली ? कोणत्या उपाययोजना करण्यात आल्यात ? या संदर्भातील विलंबाची कारणे काय आहेत ? असा प्रश्न आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी पावसाळी अधिवेशनाच्या निमित्याने आपल्या लिखित लक्षवेधीतून उपस्थित केला.

राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला मुंबई येथे सुरुवात झाली असून अमरावतीच्या आमदार सौ.सुलभाताई संजय खोडके ह्या अधिवेशनाच्या कामकाजात सहभागी झाल्या आहेत. अधिवेशनाच्या निमित्ताने त्यांनी विधिमंडळाकडे अनेक प्रश्नाचे निवेदन सादर केले असून हे प्रश्न सभागृहात चर्चेला येईपर्यंत त्यावर लिखित स्वरूपात सुद्धा कामकाज करण्यात येत आहे.

राज्यातील प्रादेशिक विकासातील असमतोल दूर करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीन वैधानिक विकास मंडळांचा कार्यकाळ दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी संपुष्टात आल्यानंतर सुद्धा पुनर्गठन करण्यात न आल्याने विकासावर जो परिणाम झाला. याबाबत आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी आपल्या लिखित लक्षवेधीमध्ये महत्वाचे मुद्दे मांडून शासनाला अवगत केले आहे.





सदर मंडळांच्या पुनर्गठनास झालेल्या विलंबामुळे मागास भागांच्या विकासासंबंधी धोरणात्मक निर्णय प्रक्रिया प्रभावित झाली असून निधीचे न्याय वाटप, विकास अनुशेष दूर करणे तसेच सिंचन, शेती, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, औद्योगिक गुंतवणूक व रोजगारनिर्मिती या क्षेत्रांतील प्रादेशिक समतोल साधण्याच्या उद्दिष्टांवर परिणाम होऊन विदर्भ व मराठवाड्यातील विकास अनुशेष अधिक वाढल्याचे निदर्शनास आले आहे.

विदर्भासाठी डॉक्टर - श्री. विजय भाकरे ,मराठवाड्यासाठी श्री. अनिल रामोड यांची नियुक्ती करण्यात आली असून मंडळच अस्तित्वात नसल्यामुळे प्रशासकीय कारणास्तव दरवर्षी प्रत्येक मंडळाचा किमान तीन कोटींचा खर्च होत असून मंडळांचे पुनर्गठन प्रलंबित असतांनाही त्यांची कार्यालये कार्यरत असून तेथील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दरवर्षी वेतन व प्रशासकीय खर्चापोटी लक्षणीय शासकीय निधी खर्च होत असल्याची बाब सुद्धा आमदार- सौ. सुलभाताई खोडके यांनी आपल्या लक्षवेधीद्वारे निदर्शनास आणली आहे.

संविधानाच्या तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याबाबत मा. राज्यपाल महोदयांनी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. मात्र अजूनही पुनर्गठन झाले नाही. याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ? असा प्रश्न सुद्धा आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी नमूद केला आहे.

यावर लिखित खुलासा करतांना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी राज्यातील उद्योग , सिंचन, रोजगार , पायाभूत सुविधा तसेच शिक्षण आदी संदर्भात प्राप्त अहवालाचा हवाला देऊन मागील पाच वर्षातील निधी वाटप व कामकाजाचा लेखाजोखा मांडला.

त्यांनी नमूद केले कि, विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे सद्यःस्थितीत अस्तित्वात नाहीत. ती पुनर्गठित करण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांमार्फत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाची मुदत दि.३०.०४.२०२० रोजी संपुष्टात आल्यानंतरही विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र या प्रदेशात अनुशेषात वाढ होवू नये याकरीता निधी वाटपाच्या सुत्राप्रमाणे विदर्भ- २३.०३ज्ञ, मराठवाडा- १८.७५ज्ञ व उर्वरित महाराष्ट्र- ५८.२३ज्ञ या प्रमाणात विभाज्य निधी वाटप करण्यात आले आहे. तसेच राज्यामध्ये उद्योगांचा समतोल विकास होण्यासाठी व कमी विकसित भागात उद्योगधंदे स्थापित व्हावे, या कारणास्तव उद्योग विभागाने सामुहिक प्रोत्साहन योजना जाहिर केली. ज्यामध्ये मागील पाच वर्षाच्या कालावधीत विदर्भात १३,४२,७९८ व मराठवाडामध्ये ८,१२,३८२ इतक्या उद्यम नोंदणी घेतलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची निर्माती केली असून त्यामुळे विदर्भात ५७.८८ लक्ष व मराठवाडामध्ये ३९.१३ लक्ष इतक्या रोजगाराची निर्मिती झालेली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, अमृतकाल रस्ते विकास योजना व त्यानुषंगाने ठविकसित महाराष्ट्ठ साठी २०२९ पर्यंत निर्धारित केलेले उद्दिष्ट यास अनुसरुन शक्यतो प्रादेशिक समतोल साधण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आपल्या लिखित खुलासामध्ये अधोरेखित केले आहे. सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी माहे एप्रिल, २०२५ ते माहे मार्च, २०२६ या कालावधीत पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले. या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर विभागात आयोजित करण्यात आलेल्या १४० रोजगार मेळाव्यांत ८,६१७ उमेदवारांची तसेच अमरावती विभागात आयोजित ९७ रोजगार मेळाव्यामध्ये ४,७२८ उमेदवारांची तसेच नागपूर विभागातील १२५ रोजगार मेळाव्यात ७,८३४ उमेदवारांची नोकरीसाठी प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

## पोलीस स्टेशन खोलापुर येथे गुटखा कार्यवाही

प्रतिनिधी २५ जून

**अमरावती :** पोलीस स्टेशन कोल्हापूरच्या वतीने गुटखा पकडण्यात आला. पोलीस अधिक्षकनिकेतन कदम यांनी पोस्टे हददीत वरली जुगार अवैदय दारु विक्री गावठी हतभाटटी व अवैध रेती वाहतुक, गोवंश वाहतुक, गुटखा विक्री व वाहतुक यांचे विरुध्द कठोर कार्यवाही करणे बाबत सर्व ठाणेदार यांना आदेशित केले.

त्या नुसार दि.२२/०६/२३ रोजी गुप्त बादमीदाराकडून मिळोल्या माहीती वरुन शासन प्रतीबंधीत गुटखा धामोरी मध्ये राहणारा शाम मोहन मिश्रा वय ३९ वर्ष रा. धामोरी ता. भातकुली जि. अमरावती याचे घरी आहे वरुन त्याचे झडती मध्ये खालील प्रमाणे गुटखा मिळुन आला. असा एकुन



४५४० रु चा माल मिळाला आहे वरुन पोस्टे खोलापुर येथे अप क्र ११०/२६ कलम अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम ५९ तसेच ँए चे कलम २२३, २७४, २७५ व कलम १२३ चे कलम नुसार दाखल करण्यात आलेला आहे

सदरची कारवाईपोलीस अधिक्षक निकेतन कदम सा यांचे आदेशान्वये मा. अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड सा, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी सा यांच्या मार्गदर्शनात खोलापूर पोलीस स्टेशनचे अनुप वाकडे, ग्रेड पोउपनी चंद्रशेखर गावंडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल/शैलेश घुरडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल/२३३२ दीपक उईके, पोलीस कॉन्स्टेबल/६२७ निखिल आमझरे यांनी केलेली आहे.

## मेळघाटाच्या स्वप्नांना पंख फुटले: ३० वर्षांपूर्वी पेरलेले एक बीज आता प्रेरणेचा वटवृक्ष बनले

प्रतिनिधी २५ जून

**अमरावती :** एकेकाळी कुपोषण, गरिबी आणि शिक्षणाचा अभाव यासाठी ओळखला जाणारा मेळघाट आज समाजाचे नेतृत्व करणारे प्राध्यापक, डॉक्टर, पोलीस अधिकारी, शिक्षक, संशोधक आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील अधिकारी घडवत आहे. हे परिवर्तन कोणत्याही चमत्काराचा परिणाम नसून, तीन दशकांपूर्वी शांतीलाल भाऊ मुठा आणि भारतीय जैन संघटना (बीजेएस) यांनी पाहिलेल्या एका स्वप्नाची ही परिणती आहे. त्यांचा विश्वास होता की, ठमदत ही केवळ तात्पुरती असते, परंतु मुलांना शिक्षण मिळाल्यास संपूर्ण समाजाचे परिवर्तन होऊ शकते.



मेळघाटातील या यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि माजी विद्यार्थ्यांचा, ज्यांनी समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील वर्षा बंगलो येथे सन्मान करण्यात आला. हा सन्मान केवळ त्यांच्या वैयक्तिक कामगिरीची पोचपावती नव्हता, तर मेळघाटसारख्या दुर्गम आणि वंचित भागातील हजारो मुलांच्या क्षमतेची पोचपावती होती. मेळघाट हे नाव फार पूर्वीपासून कुपोषण, निरक्षरता आणि वंचनेशी जोडले गेले आहे. परंतु शांतीलाल मुथा फाउंडेशन आणि भारतीय जैन संघटना यांनी केवळ मदत आणि साहाय्यापुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही. या संस्थेने हा विश्वास रुजवला की, जर वंचित मुलांना शिक्षण, संस्कार, सुरक्षित वातावरण आणि योग्य मार्गदर्शन मिळाले, तर ते त्यांच्या कुटुंबाचे, समाजाचे आणि संपूर्ण प्रदेशाचे भविष्य बदलू शकतात.

याच दूरदृष्टीने, मेळघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पुनर्वसनाची मोहीम सुरू करण्यात आली. आज हे स्वप्न साकार झाले असून, शेकडो विद्यार्थ्यांना शिक्षण, निवास, मार्गदर्शन आणि सर्वांगीण विकासाची संधी मिळाली आहे. सन्मानित माजी विद्यार्थ्यांपैकी, प्रा. डॉ. सुनील रामलाल मावस्कर, ज्यांनी बीजेएसमधून शिक्षण घेतले, ते आता अमरावती येथील प्रतिष्ठित श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी कोरकू भाषा, लोकसाहित्य आणि आदिवासी संस्कृतीच्या जतनासाठी, तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मार्गदर्शनासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

डॉ. संजू बाबू ठाकरे यांनी एमबीबीएस आणि स्त्रीरोगशास्त्र पूर्ण करून २०१२ पासून मेळघाटाच्या आदिवासी भागात आरोग्य सेवा देण्यासाठी स्वतःला समर्पित केले आहे. माता व बाल आरोग्य, सुरक्षित प्रसूती आणि जनजागृतीमध्ये सुधारणा करून त्यांनी हजारो कुटुंबांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे.



अमरावती शहरात मुसळधार पाऊस, प्रशासनाची उडाली खडबड, रस्त्यांवर पाणीच पाणी. बुधवारी अर्धा तास पाऊस आल्यानंतर राजमंगल सोसायटी मधे साचलेल्या गटाराच्या पाण्याची क्षणचित्रे. लहान मुलांना व जेष्ठ नागरिकांना पावसाच्या पाण्याची मजा घेता आली.

## ग्रामीण हद्दीतुन मोटर सायकल चोरी करणाऱ्या अट्टल चोराला गुन्हे शाखेने घेतले ताब्यात

**अमरावती:** ग्रामीण हददतुन मोटर सायकल चोरी करणा-या अटटल चोराला गुन्हे शाखेने ताब्यात घेतले असून चोरी गेलेल्या ४ मोटर सायकल चे गुन्हे उघड केले. पोलीस आयुक्त यांनी आदेश दिले होते की, रेकॉर्ड वरील वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हेगारांना चेक करून व त्यांचेवर पाळत ठेवुन योग्य प्रभावी कार्यवाही करण्याबाबत आदेश प्राप्त झाले वरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांचे नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालय हद्दीत पो. स्टॉफसह रेकॉर्ड वरील वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हेगार चेकिंग करीता पेट्रोलींग करीत असतांना. दिनांक २ जून रोजी गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि, पोलीस स्टेशन गाडगे नगर अपराध क्रमांक ६५४/२०२६

### ♦ चोरी गेलेल्या ४ मोटर सायकल चे गुन्हे उघड



कलम ३०३(२) भा. न्या. सं. मधील चोरीस गेलेली मोटार सायकल घेवुन दस्तुर नगर चौक येथे उभा आहे अशा मिळालेल्या माहीती वरूण गुन्हे शाखेचे पथक हे नमुद ठिकाणी गेले असता. सदर इसम हा नमुद माहीती प्रमाणे असल्याची खात्री झाल्याने त्या इसमास व्हेस्पा कंपनीची सिल्व्हर रंगाची मोटर सायकल वाहनासह पो. स्टाफचे मदतीने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमास त्याचे ताब्यातील वाहना बाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिली व वाहनाचे कागदपत्रे नसल्याचे सांगीतले वरून नमुद इसमास त्याचे नावगाव विचारले असता त्याने त्याचे नाव सुरेश डोमा वाडीवा वय २६ वर्ष रा. केसीया, ग्राम सयरा ता. शहापुर जि. बैतुल मध्यप्रदेश ह. मु दस्तुर नगर, अमरावती असे सांगीतले त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यानी सांगीतले की एक यामाहा कंपनीची मोरपंखी रंगाची मोटर सायकल मोटर सायकल अंदाजे १० दिवसापुर्वी शेगाव नाका येथुन चोरी केलेली असल्याचे सांगीतले.

## महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियनच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन संलग्न: भारतीय खेत मजदूर युनियन (BKMU) (अमरावती जिल्हा कौन्सिल)च्या वतीने दिनांक १५ ते २२ जून २०२६ दरम्यान मनरेगा बचाव जनजागरण अभियान राबविण्यात आले. देशव्यापी आंदोलनांतर्गत दिनांक २३ जून २०२६ रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे आंदोलन सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत महा धरणे आंदोलन करण्यात आले.

शेतीच्या यांत्रिकीकरणाबरोबर विस्थापित झालेल्या शेतमजूरांना सरकार वाऱ्यावर सोडत आहे. शेतीमध्ये काम कमी झाले आहे. मजुरी अत्यल्प आहे. महागाई प्रचंड वाढत आहे. अन्न वस्त्र निवारा आरोग्य शिक्षण ह्या प्राथमिक गरजा

### ♦ व्हीबी ग्रामजी कायदा रद्द करून मनरेगा कायदा पुन्हा लागू करण्याची मागणी



पूर्ण करणे अत्यंत कठीण झाले आहे. महिला मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जात पूर्णपणे बुडालेल्या आहेत.सरकारी कर्ज मिळत नाही. प्रकल्पात सर्वाधिक विस्थापित शेतमजूर होत आहेत. सरकारी धान्य दुकानात अत्यंत निकृष्ट धान्य मिळत आहे. घरकुलाला मिळणारी रक्कम अत्यंत तुटपुंजी आहे. घरकुल बांधल्यानंतर पुन्हा कर्जाचा डोंगर वाढत आहे. शेतकऱ्यांप्रमाणे किमान सवलती आणि सन्मानधन मिळत नाही. शिक्षणापासून सर्वाधिक वंचित शेतमजुरांची मुले मुली राहत आहेत. अनेक जिल्हा परिषद शाळा बंद होत आहे. खेड्यांची अवस्था हिन दीन होत आहे. सरकार महासत्तेच्या बाता करत आहे आणि गाव खेडे व शेतमजूरांना रानटी अवस्थेत ढकलत आहे. प्रचंड श्रीमंती एकीकडे वाढत आहेत तर गरीब आणखी गरीब होत आहे.

## चोरीची मोटरसायकल विक्री करण्यास येणारा आरोपी पोलीसांचे ताब्यात

प्रतिनिधी २५ जून

**अमरावती** :चोरीची मोटरसायकल विक्री करण्यास येणारा आरोपी पोलीसांचे ताब्यात घेण्यात शहर पोलिसांना यश आले आहे. पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती शहर येथे दिनांक १२ जून रोजी १ वा. च्या सुमारास फिर्यादी ऋषीकेश साहेबराव घाटे वय २७ वर्ष रा. भिमनगर अमरावती यांनी भिमनगर जवळील सरकारी संडास जवळुन हिरो होन्डा स्पेन्डर प्लॅस क. एमएच २७ सीजी ९६२८ मोटरसायकल व व्हिओ मोबाईल चोरी गेल्यावरून पो.स्टे.ला अप.क. ६५२/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.स. अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हा तपासावर असतांना डि.बी. पथकास गुप्त खात्रीलायक बातमीदाराकडुन बातमी मिळाली की



एक इसम तहसिल ऑफीस जवळ मोटरसायकल विक्री करण्यासाठी येणार आहे त्यावरून डि.बी. स्टॉफने अत्यंत शिताफीने तहसिल कार्यालयाजवळ सापळा रचुन मोटरसायकल चोरी करण्यारा इसम येताच त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने आपले नाव जय शिवानंद लोखंडे वय १९ वर्ष रा. शेमलाई पोस्ट झोडगा ता. कारंजा जि. वाशीम ह.मु. भिमनगर सावळे गल्ली अमरावती असे सांगितले त्यास त्यावे जवळ असलेल्या हिरो होन्डा स्प्लॅन्डर प्लॅस मोटरसायकल बाबत बारकाईने विचारपुस केली असता त्याने सदर मोटरसायकल व त्यामध्ये असलेला व्हिओ कंपनीचा मोबाईल भिमनगर सरकारी संडास जवळुन चोरी केल्याचे सांगितले वरून सदर गुन्हयात आरोपीताकडुन चोरी केलेली हिरो होन्डा स्पेन्डर प्लॅस क. एमएच २७ सीजी ९६२८ मोटरसायकल ५०,००० रू. व व्हिओ कंपनीचा मोबाईल १५,००० रू. असा एकुण ६५,००० रू.चा मुददेमाल तपासकामी जप्त करण्यात डि. बी. पथकास यश प्राप्त झाले आहे.

## परिवहन मंत्र्यांच्या हस्तक्षेपाने आरटीओ कर्मचाऱ्यांचा संप मागे

### ♦ प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक चर्चा; आज पासून राज्यातील आरटीओ सेवा पूर्ववत

प्रतिनिधी २५ जून

**अमरावती:** गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेला राज्यातील मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप अखेर मागे घेण्यात आला असून, आज पासून राज्यभरातील आरटीओ कार्यालयांमधील कामकाज सुरळीतपणे सुरू होणार आहे. परिवहन मंत्री मा. ना. प्रताप सरनाईक यांनी संघटनेच्या प्रतिनिधींशी सकारात्मक चर्चा करून प्रलंबित मागण्यांबाबत आश्वासक भूमिका घेतल्याने हा तोडगा निघाला. आरटीओ कर्मचारी संघटनेने सेवा प्रवेश नियम, पदोन्नती, पदनाम बदल, सरळसेवा नियुक्ती, तसेच आश्वासित प्रगती योजनेसह विविध



प्रलंबित मागण्यांसाठी १६ जूनपासून बेमुदत संप पुकारला होता. या संपामुळे राज्यातील वाहन नोंदणी, परवाना, कर वसुली आणि इतर अनेक सेवा प्रभावित झाल्या होत्या. संपाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अनेक आमदार व खासदारांनी परिवहन मंत्र्यांकडे कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली होती. तसेच विविध माध्यमांतून या प्रश्नाला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाल्याने शासनावरही निर्णय घेण्यासाठी दबाव वाढला होता. सोमवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी पदोन्नतीच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करण्याचे तसेच इतर मागण्यांबाबत निश्चित कालमर्यादेत निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले.

## महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी पार्थ लोडम यांची नियुक्ती



प्रतिनिधी २५ जून

**दर्यापूर :** महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुगत उर्फ सुगतानंद तुळशीराम भटकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या अमरावती (ग्रामीण) जिल्हाध्यक्षपदी पार्थ प्रफुल्लराव लोडम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शेतकरी हिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने कार्य करणारे तसेच सामाजिक व संघटनात्मक क्षेत्रात सक्रिय असलेल्या पार्थ लोडम यांच्यावर संघटनेने ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. संघटनेच्या ध्येय-धोरणांनुसार शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे, संघटना गावागावांत बळकट करणे आणि शेतकरी बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी ते कार्य करतील, असा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष सुगतानंद भटकर यांनी नियुक्तीपत्र प्रदान करून पार्थ लोडम यांची अमरावती (ग्रामीण) जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. २५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# सीमेंट व लोखंडाचे भाव झाले कमी, घर काढ़ा बांधायला

प्रतिनिधी २५ जून

**अकोला :** अनेकांना आपले स्वतःचे पक्के व सुंदर घर असावे असे स्वप्न असते परंतु मागील काही दिवसांपासून बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झाल्याने अनेकांनी घराच्या बांधकामाचा विचारच सोडून दिला होता परंतु आता घर बांधण्याचा विचार करणाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी ही की मागील काही दिवसात बांधकामाचे लोखंड आणि सिमेंटच्या दरात लक्षणीय घसरण झाली असून आगामी काळात

## ♦ लोखंडाच्या दरात प्रति टन चार हजारापर्यंत घसरण



आणखी दर कपात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे बांधकाम साहित्याचे दर जरी कमी झाले असतील तरी फ्लॅट आणि रो हाऊस च्या किमती लगेच कमी होतील अशी शक्यता कमी असल्याचे मत बांधकाम क्षेत्रातील



तज्ञ व्यक्त करीत आहेत.

### बांधकामाच्या लोखंडाच्या किमतीत चार हजारापर्यंत घसरण

सध्या लोखंडाच्या किमती मागील काही आठवड्यात प्रति टन सुमारे चार हजारापर्यंत कमी झाले आहेत त्यामुळे घर बांधकामाच्या एकूण खर्चावर सकारात्मक परिणाम होणार आहे त्याचबरोबर बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या सिमेंटचे दर सुद्धा उतरले आहेत विविध कंपन्यांच्या सिमेंटचे दर प्रति बॅग दहा ते ३० रुपयापर्यंत कमी झाले आहेत त्यामुळे इमारतीच्या पाया भिंती व स्लॅब यासारख्या कामांचा खर्च तुलनेने कमी होण्यास मदत होणार आहे.

### सिमेंट व लोखंड सोडून अन्य साहित्याच्या किमती कायम

बांधकामाचे लोखंड आणि सिमेंट स्वस्त झाले असले तरी रेती गिट्टी विटा इलेक्ट्रिकल साहित्य प्लंबिंग साहित्य तसेच बांधकाम मजुरीचे दर अद्याप कायम असल्याने घर बांधकामाचा एकूण खर्च अपेक्ष इतका कमी होणार नाही असे बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांचे मत आहे

# 'दोनशे रुपये घ्या ओटीपी द्या' चा धंदा शहरात जोरात सुरू

## ♦ शहरात परत चढ्या किमतीने विकले जात आहेत गॅस सिलेंडर

प्रतिनिधी २५ जून

**अकोला :** खाडीयुद्धामुळे देशात निर्माण झालेल्या इंधन टंचाईमुळे तसेच गॅस सिलेंडर मिळेनासे झाल्यामुळे अनेक हॉटेल व्यवसायिकांनी लाकूड तसेच डिझेलवर चालणाऱ्या भट्टयांचा वापर सुरू केला होता. तर गॅस कंपनी यांनी सुद्धा ग्राहकांना डिलिव्हरी कोड प्राप्त झाल्यानंतरच सिलेंडर देणे अनिवार्य केले होते त्यामुळे मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडरच्या काळाबाजार वर अंकुश लागला होता खाडी युद्ध संपल्यात जमा झाल्याने व इंधनाचा पुरवठा सुरळीत होत असल्याने आता परत शहरात सिलेंडरची काळाबाजारी वाढल्याचे दिसून येत आहे घरगुती एलपीजी सिलेंडरची डिलिव्हरी देताना ग्राहकांकडून डिलिव्हरी कोड अर्थात ओटीपी घेऊन तेच सिलेंडर पुन्हा दुसरीकडे फिरवण्याचा धंदाच सध्या जोरात असून त्यामुळे ग्राहकांना प्रचंड मनस्ताप होत आहे धक्कादायक म्हणजे शहर



परिसरातील व्यवसायिकांना १६०० ते २००० रुपयांना हे सिलेंडर काळा बाजारात विक्री केले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. शासनाच्या आदेशानुसार सिलेंडरची डिलिव्हरी झाल्याच्या तारखेपासून पुढील २५ दिवसापर्यंत नवीन सिलेंडरची मागणी ग्राहकाला नोंदविता येत नाही तसेच व्यावसायिक सिलेंडर घेण्यावरही अनेक मर्यादा घालण्यात आले आहेत याचा गैरफायदा आता काही गॅस एजन्सी मधील कर्मचारी घेत असल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून होत आहेत.

### दोनशे रुपये द्या ओटीपी दया चा धंदा शहरात जोरात सुरू

२५ दिवसानंतर गॅस बुकिंग केल्यानंतरही अनेक परिवारांच्या घरचा सिलेंडर संपला नसल्याने व वेळेवर पैशाची जुळवाजवळ होत नसल्याने सिलेंडर घ्यावा की नाही या विचारात पडलेल्या ग्राहकांना गॅस एजन्सीचे कर्मचारी तुम्ही सध्या दोनशे रुपये घ्या आणि ओटीपी आम्हाला दया आम्ही तुम्हाला तुमचा गॅस सिलेंडर संपल्यानंतर त्वरित सिलेंडर देऊ असे आश्वासन देत ग्राहकांकडून ओटीपी घेत आहेत. आणि हा सिलेंडर व्यवसायिकांना सोळाशे ते दोन हजार रुपयात विकत आहेत. त्यामुळे ग्राहकांचा डिलिव्हरी कोड किंवा ओटीपी क्रमांक वापरून परस्पर दुसऱ्याला सिलेंडरची डिलिव्हरी होणे किंवा ज्यांनी बुकिंग केले आहे त्या ग्राहकांकडे सिलेंडर न पोहोचणे त्यासाठी गॅस एजन्सीकडे पाठपुरावा करावा लागणे असे प्रकार शहरात घडत आहेत प्रशासनाने याची दखल घेऊन सिलेंडर कुठे जात आहेत? याचा शोध घ्यावा तसेच सिलेंडरची काळाबाजारी करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी आता जोर धरत आहे

# राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचा दौरा

प्रतिनिधी २५ जून

**अमरावती:** राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर या दि. ३ जुलै रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यानुसार, श्रीमती रहाटकर दि. ३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता अमरावती विभागातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांची बैठक घेतील. दुपारी १२.३० वाजता अमरावती परिक्षेत्रातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतील. दुपारी २.३० वाजता 'महिला जन सुनावणी'चे आयोजन करण्यात आले आहे. तसेच पॉश प्रशिक्षण आणि 'शी सर्व्हज' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींशी संवाद साधून चर्चा करण्यात येणार आहे.


# एस. आर. पाटील शाळेच्या अनधिकृत बांधकामावर पुन्हा हातोडा

**गुरूवारी यंत्रणेसह पोलिस संस्थेच्या परिसरात दाखल**

प्रतिनिधी २५ जून

**अकोला :** अकोला शहरातील दक्षिण झोन अंतर्गत हरिष आश्विन कॉलनी येथील एस. आर. पाटील कॉलेज सहकार नगर या शैक्षणिक संस्थेच्या इमारतीवर निष्कासनाची कार्यवाही १७ जून रोजी अपूर्ण राहिल्यामुळे उर्वरित कार्यवाही २५ जून रोजी सकाळी करण्यात आली. महापालिकेची यंत्रणा तसेच पोलिस देखील या ठिकाणी पोहोचले आहे.

विशेष म्हणजे १७ जून रोजी झालेल्या कार्यवाही बाबतीत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती. आर आर सी नेटवर्कने लोकांचे मत जाणून घेतले होते. त्या दिवशी थातूरमातूर कार्यवाही करण्यात आली त्यामुळे उर्वरित बांधकाम केव्हा काढले जाते



याकडे लक्ष होते. त्या नुसार गुरूवारी सकाळ पासून निष्कासन कार्य हाती घेतले आहे. कार्यवाही करण्यासाठी एक जे.सी.बी. मशिन, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर ब्रेकर, इलेक्ट्रिक कटर गॅस कटर व हॅण्ड कॉंक्रीट ड्रिल, विद्युत पुरवठा खंडीत करावयाचा झाल्यास, वायरमन व आवश्यक यंत्र सामुग्री व आवश्यक मनुष्यबळासह हजर झाले होते. तसेच उपरोक्त कार्यवाही दरम्यान काही दुर्घटना घडू नये या बाबतचे नियोजन सुरक्षतेच्या दृष्टीने करावे, असे सहायक आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी अतिक्रमण निर्मूलन कक्ष अकोला महानगरपालिका यांनी पत्रात नमूद केले होते.

# स्थानिक गुन्हे शाखेने दिले १५ गोवंशांना जीवनदान

प्रतिनिधी २५ जून

**अकोला :**स्थानिक गुन्हे शाखा पोलिस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांना माहीती मिळाली की, खैर मोहम्मद प्लॉट परिसरात एक इसम त्याचे गोठ्यात अवैधरित्या निदर्यतने गोवंश जातीचे



जनावरे कत्तली करीता बांधुन ठेवले आहे. पथकाने खैरमोहम्मद प्लॉट येथे छापा टाकुन गोठयाचा मालक मोहम्मद अदनान शेख इरफान वय २० वर्षे रा. खैर मोहम्म्द प्लॉट, अकोला यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातील कत्तली करीता बांधुन ठेवलेले जख्मी अवस्थेतील गोवंश जातीचे १५ गो-हे एकुण किंमत ०४,२०,०००/- चा मुद्देमाल हस्तगत केला. गोवंशाची सुटका केली. गोवंश उपचार, देखरेख व संगोपनाकरीता आदर्श गोसेवा संस्थान, म्हैसपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली.

# वारंवार खंडित विजेमुळे प्रभाग 18 चे नागरिक महावितरण कार्यालयात धडकले



प्रतिनिधी २५ जून

**अकोला :** महानगरातील प्रभाग १८ मध्ये मागील काही दिवसापासून संध्याकाळ पासून रात्री पर्यंत कित्येक वेळा वीज पुरवठा खंडित होत आहे. या कारणामुळे परिसरात राहणारे नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे या समस्येला कंटाळून बुधवारी (दि.२४) जून रोजी या परिसरातील नागरिकांनी आपला मोर्चा महावितरणकडे वळविला आणि या समस्येचा निपटारा करण्याची मागणी मुख्य अभियंता दत्तात्रय बनसोडे यांच्याशी केली. यावेळी नागरिकांनी वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याविषयी जाब विचारला व तत्काल या समस्येचे निराकरण करण्याची मागणी केली. महानगरातील प्रभाग १८ मध्ये गीतानगर, मातोश्री कॉलनी, पोलीस वसाहत, एमरोल्ड कॉलनी, अकोली खुर्द हा परिसरात येतो. यातील बहुतांश परिसर हा हद्दवाढ भागात आहे. या ठिकाणी रात्रीच्या वेळी वीज पुरवठा खंडित झाल्यास नागरिकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. यावेळी प्रभागातील सामाजिक कार्यकर्ते दिलीप मिश्रा, जगदीश झांबरे, अन्ना विसपुते, सागर राजपूत, बंटी यादव, रोहीत खडसे, कनौजिया, मदन गोपनारायण, मुकेश अग्रवाल, प्रवीण पाटील, पवन तिवारी, शर्मा, बगरेचा, प्रमोद टेकाडे, एस.दुबे, यांच्यासोबत व अनेक नागरिक उपस्थित होते. त्यावेळी मुख्य अभियंता दत्तात्रय बनसोडे यांनी होणाऱ्या त्रासाबद्दल दिलगिरी व्यक्त करून सोमवार पर्यंत या समस्येचे निराकरण करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# माता – बाल संगोपन केंद्रासाठी 33 कोटींचा निधी देण्यात यावा

## ♦ पावसाळी अधिवेशनात आ. खोडके यांनी मांडला औचित्याच्या मुद्दा

प्रतिनिधी २५ जून

**अमरावती :** अमरावती जिल्ह्यासह ग्रामीण-दुर्गम भाग तसेच सीमाभागातील माता, गरोदर महिला व नवजात बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अमरावती येथे मंजूर असलेल्या १०० खाटांच्या माता - बाल संगोपन केंद्रासाठी ३३ कोटींचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली आहे. आरोग्याच्या दृष्टीने सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या विषयावर औचित्याच्या मुद्द्याद्वारे



सभागृहाचे लक्ष वेधतांना आ. सुलभा खोडके यांनी सांगितले कि, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अमरावती शहरात १०० खाटांचे माता-बाल संगोपन केंद्र (एम.सी. एच. विंग ) उभारण्यास शासनाने गेल्या १२ ऑगस्ट २०२४ रोजी ३३ कोटींच्या निधीसह प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. या प्रशासकिय मान्यतेला प्रदीर्घ कालावधी उलटून देखीलही या मंजूर केंद्राला अजूनही आवश्यक कामांकरिता निधी उपलब्ध होवू न शकल्यामुळे अत्यंत महत्वाच्या या आरोग्य केंद्राचे काम केवळ निधी अभावी रखडले आहे. अमरावती हे विभागाच्या पाच जिल्ह्याचे मुख्यालय असल्याने या ठिकाणी दुरून दुरून रुग्णांचा ओघ दिसून येतो. मात्र १०० खाटांच्या माता -बाल संगोपन केंद्राचे काम रखडल्याने गरजू माता, गरोदर महिला आणि नवजात बालकांना आरोग्याच्या अत्यंत आवश्यक तातडीच्या सेवा- सुविधापासून वंचित राहावं लागत आहे.

# यवतमाळ जिल्ह्यात सरासरीच्या 51 टक्केच पाऊस


प्रतिनिधी २५ जून

**यवतमाळ :** जून महिन्याच्या २५ तारखेपर्यंत यवतमाळ जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ५१.४ टक्के पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ७०.२ मिलिमीटर पाऊस झाला असून, अनेक तालुक्यांमध्ये अद्याप दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. जिल्ह्यातील झरीजामणी तालुक्यात सर्वाधिक १०१.३ मिलिमीटर पाऊस झाला असून, तो सरासरीच्या ११५.२ टक्के आहे. नेर तालुक्यात १०३.८ मिलिमीटर(९३.९ टक्के) आणि वणी तालुक्यात ११५.३ मिलिमीटर (९०.१ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे हे तीन तालुके पावसाच्या बाबतीत आघाडीवर आहेत. दुसरीकडे यवतमाळ व महागाव तालुक्यांमध्ये केवळ २९.७ टक्के पाऊस झाला आहे. कळंबमध्ये ४० टक्के, पुसदमध्ये ४१.५ टक्के, केळापूरमध्ये ४५.१ टक्के आणि राळेगावमध्ये ४३.८ टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे अनेक भागांत खरीप पिकांसाठी समाधानकारक पावसाची प्रतीक्षा आहे. गेल्या चोवीस तासांत घाटंजी तालुक्यात सर्वाधिक १५.७ मिलिमीटर पाऊस झाला. पुसदमध्ये १५.३ मिलिमीटर, यवतमाळमध्ये १४.३ मिलिमीटर, तर दिग्रसमध्ये ११ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. वणी आणि मारेगाव तालुक्यांत मात्र केवळ १.३ मिलिमीटर पाऊस झाला.

















हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK